
# कर्मयोगी श्रध्देय

# दत्तोपंत ठेंगडी

लेखक
उदय पटवर्धन



जन्मशताब्दी वर्ष १० नोव्हेंबर २०१९ ते १० नोव्हेंबर २०२०

# मेरी कामना

(स्व. श्रध्देय दत्तोपंत ठेंगडीजी चे काव्य)

सुनता और पढता आया हूँ की इच्छाएँ इत्यलम कहना नही जानती और चाहों का चक्र कभी नहीं थमता। मगर में तो कामनाओं के वृत्त में दौडने का रसिक हूँ। पाने का अपना आनंद होता होगा, किन्तु चाहने का सुख भी छोटा नही है, यदि चाह छोटी न हो। इसलिए चाहता हूँ।

मनुष्य को पंगु और बौना बनानेवाली गरीबी मिटे,
जिवीका के लिए जीवन रेहन न रखना पडे,
रोटी इन्सान को न खाये ।।
मशीनें श्रम की कठोरता को घटायें,
उत्पादकता को बढायें,
मगर वे श्रम का अवसर न छीनें,
न आदमी को अपना पुर्जा बना पायें ।।
पृथ्वी का दोहन विवेक पूर्वक हो,
प्रकृति से द्रोह न किया जाये ।।
दरिद्रता, दैन्य और अत्याचार को मिटाने का वीरावेश भडके,
परंतु क्रुरता बहादूरी का मुखौटा पहनकर न घूमे ।।
समाज और व्यक्ति राष्ट्र और विश्व में परस्पराश्रय हो,
परस्पर विरोध नहीं।
धनी-निर्धन, विद्वान-अनपढ और
शासक - शोषित का द्वैत मिटकर अद्वैत उभरे ।।
सुख विलासिता का,
सादगी रसहिनता और मनहुसियत का,
तप वर्जनाओं का,
कला कृत्रितमता का पर्यायवाची न बने ।।
सत्य संख्या में न दब जाये,
सौंदर्य अलंकरण में न छिप जाये,
विज्ञान हिंसा का दास न हो ।।
जीवन और जगत् पर प्रकाश,
आनंद और करुणा का राज्य हो ।।
इन चाहों के चक्कर में मै युग-युग भटकने को तैयार हूँ ।

कर्मयोगी
श्रध्देय

# दत्तोपंत ठेंगडी


लेखक

**उदय पटवर्धन**

माजी राष्ट्रीय महामंत्री, भा.म. संघ
प्रभारी केंद्र व राज्य सरकारी कर्मचारी परिसंघ

■ **प्रकाशक**

भारतीय मजदूर संघ

१८५, शनिवार पेठ, विश्वकर्मा भवन

पुणे ४११०३०

© **भारतीय मजदूर संघ**

■ **अक्षरजुळणी**

संवाद, पुणे.

■ **मुखपृष्ठ**

संवाद, पुणे.

■ **मुद्रक**

संवाद ट्रेडप्रिंट्स

दूरभाष : ०२० - २४४८५६३२

■ **प्रथमावृत्ती**

२७ ऑक्टोबर २०१९

■ **मूल्य : ऐच्छिक**



**श्री दत्तोपंत ठेंगडी** भारतीय मजदूर संघ के संस्थापक

# प्रस्तावना...

सस्नेह नमस्कार,

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक, एक दार्शनिक, राष्ट्रऋषी, कर्मयोगी व भारतीय मजदूर संघाचे संस्थापक महामंत्री तसेच राष्ट्रीय विचारांची जोपासना करणाऱ्या विविध जनसंघटनांचे संस्थापक, मार्गदर्शक श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी यांची जन्मशताब्दी या वर्षी १० नोव्हेंबर २०१९ ते १० नोव्हेंबर २०२० या काळात देशभर विविध उपक्रमांनी संपन्न होणार आहे.

श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी यांना पाहिलेले, ऐकलेले, अनुभवलेले पदाधिकारी तसेच कार्यकर्ते, सदस्य आता काळाच्या ओघात दुर्मिळ होत चाललेले आहेत असे सर्वत्र दिसते व आम्हाला तसे अनुभवास आले आहे. त्यामुळे या जन्मशताब्दी वर्षात श्रद्धेय दत्तोपंत यांचे जीवन, त्यांच्या धारणा व त्यांनी दिलेले पाथेय व त्यांनी जोपासलेली कार्यसंस्कृती सर्व समाजासमोर यावी या उद्देशाने एका छोटेखानी पुस्तकाची कल्पना सर्वांसमोर येऊन एकमताने तातडीने याच्या मागे लागावे असा आग्रह सर्व जाणत्या, जुन्या व नव्या कार्यकर्त्यांनी केला.

पुस्तक प्रकाशित करण्यासाठी श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी यांना पाहिलेले, अनुभवलेले व त्यांच्या सहवासात व संपर्कात असलेले श्री. उदयराव पटवर्धन यांचे नाव आमच्यासमोर आले. श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी यांनी संपूर्ण जीवनभर अनुसरलेल्या तत्त्वज्ञानाची मांडणी ते उत्तमप्रकारे करू शकतात. त्यामुळे सर्वजणांनी मा. श्री. उदयराव यांना विनंती केली व त्यांनी ती मान्य करून एक पुस्तक लिखाणाला सुरुवात केली, याचे अंतिम रूप आपणा सर्वांसमोर आहे.

मा. उदयराव यांनी हे अभूतपूर्व कार्य मनावर घेऊन अत्यंत परिश्रमपूर्वक संपन्न केले आहे. ''आजा तनमन और जीव धन सभी कुछ हो समर्पण'' या गीतातील भावनेला न्याय देऊन त्यांच्या जीवनाचा सर्व भाव या पुस्तकात उतरविला आहे. एक अप्रतिम, ऐतिहासिक पुस्तक आपणा सर्वांसमोर येत आहे, ज्याची नोंद इतिहासात नक्कीच होईल.

मा. उदयराव यांना आभार मानलेले आवडणार नाही, त्यामुळे भा. म. संघ महाराष्ट्र प्रदेश त्यांचा ऋणात राहू इच्छितो, तरीसुद्धा एक औपचारिकता म्हणून आम्ही त्यांचे आभारी आहोत.

हे पुस्तक तयार करण्यासाठी सौ. वेदा आगटे, श्री. प्रकाश रानडे यांनी भरपूर परिश्रम केले व त्यात चूक होऊ नये याची काळजी घेतली, त्याबद्दल त्यांचे आभार मानत आहोत. याचे मुखपृष्ठ श्री. चैतन्य खरे यांनी तयार केले आहे. छपाई संवाद ट्रेडप्रिंट्स, पुणे यांनी केली आहे, त्या सर्वांचे आभार.

आपण सर्वजण या पुस्तकाचे स्वागत करून त्याचा प्रसार करालच.

श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी यांचे जन्मशताब्दी वर्ष आपणा सर्वांना ध्येय पथावर, अथक चालावे यासाठी किंबहुना त्यांनी अनुसरलेल्या ''चरैवेति चरैवेति यहि तो मंत्र है अपना, सतत चलना सतत चलना,'' या न्यायाने सतत प्रेरणा देत राहो.

धन्यवाद.

स्नेहांकित, २७ ऑक्टोबर २०१९,

रवींद्र देशपांडे, सरचिटणीस अश्विन कृष्ण १४ शके १९४१

## ■ दत्तोपंत ठेंगडी परिचय

नाव : दत्तात्रेय बापुराव ठेंगडी उपाख्य दत्तोपंत ठेंगडी

पिता का नाम : श्री बापुराव दाजीबा ठेंगडी

जन्म : अश्विन मास, बुधवार, अमावस्या ( दीपावली), शक् सम्वत् १९८२ तद्नुसार १० नोव्हेंबर १९२०

जन्म स्थान : आर्वी, जिल्हा वर्धा (महाराष्ट्र)

शिक्षण : बी.ए. एल एल बी, मॉरिस कॉलेज, नागपूर

प्रचारक : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (१९४२ पासून अखेर पर्यंत)

भाषा : हिन्दी, बंगाली, संस्कृत, मल्याळम्, इंग्रजी, मराठी

मृत्यु : १४ ऑक्टोंबर २००४ ( पुणे)

## ■ सुरवातीचा काळ

१. अध्यक्ष : वानर सेना आर्वी तालुका कमिटी (१९३५)

२. अध्यक्ष : म्युन्सिपल हायस्कूल, आर्वी विद्यार्थी संघ (१९३५-३६)

३. सचिव : म्युनिनिपल हायस्कूल, गरीब विद्यार्थी फंड समिति (१९३५-३६)

४. संघटक : आर्वी गोवारी झुग्गी झोपडी मंडळ (१९३६)

५. प्रोबेशनर : हिंदुस्थान समाजवादी रिपब्लिकन सेना, नागपूर (१९३६-३८)

## ■ संस्थापक

१. भारतीय मजदूर संघ (२३ जुलै १९५५- भोपाळ)

२. भारतीय किसान संघ (४ मार्च १९७९ - कोटा)

३. सामाजिक समरसता मंच (१४ एप्रिल १९८३)

४. सर्वपंथ समादर मंच (१४ एप्रिल १९९१, मुंबई)

५. स्वदेशी जागरण मंच (२२ नोव्हेंबर १९९१, नागपूर)

६. पर्यावरण मंच

## ■ मार्गदर्शक : उद्घाटनकर्ता

१. अखिल भारतीय अधिवक्ता परिषद (९ जुलै १९४९)

२. भारतीय विचार केंद्र (७ ऑक्टोंबर १९८२- तिरुवनंतपुरम्)

## ■ संस्थापक सदस्य

१. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (९ जुलै १९४९)

२. सहकार भारती

३. अखिल भारतीय ग्राहक पंचायत

## ■ संरक्षक

१. ऑल इंडिया रिटायर्ड रेल्वे मेन्स फेडरेशन

२. ऑल इंडिया फेडरेशन ऑफ पेन्शनर्स असोसिएशन

३. ऑल इंडिया रेल्वे टेलिग्राफ स्टाफ कौन्सिल

४. लोको मेकेनिकल आर्टीजन्स स्टाफ असोसिएशन पूर्व रेल्वे

५. ऑल इंडिया स्टेनोग्राफर्स असोसिएशन

६. ऑल इंडिया ड्राइविंग स्टाफ असोसिएशन

७. तामिळनाडू प्रोव्हिडंट फंड एम्प्लाईज असोसिएशन

८. वेलफेअर सोसायटी फतेहनगर, नई दिल्ली

९. उत्तर प्रदेशीय विश्वकर्मा विकास परिषद

१०. भारतीय कारीगर सूचना केन्द्र, विदर्भ

११. आन्ध्र प्रदेश चेतना बुनकर फोरम (१९६५)

१२. उत्तर प्रदेश समाज, दिल्ली

१३. भारतीय कैत्तरी नेसवु थोझीलालर युनियन, तामिळनाडू

१४. भारतीय शिक्षण मंडळ

१५. शिल्पकार कल्याण संघ, चुनार (उत्तर प्रदेश)

१६. विश्वकर्मा समाज सभा, दिल्ली

१७. ऑल इंडिया केन्द्रीय स्कूल

## ■ सहाय्यक सदस्य

१. इंडियन ॲकेडमी ऑफ लेबर आर्बीट्रेडर्स

२. विश्वकर्मा प्रतिनिधी सभा, पंजाव

३. भारतीय आदिम जाती सेवक संघ, नवी दिल्ली

४. अनुसुचित जाती फेडरेशन ( पूर्व भागात एम पी युनिअ १९४३-४४)

५. पिंउ ग्राम सुधार सभा (पंजाव) संत हरिचंद सिंह लोगोवाल

६. वनवासी कल्याण आश्रम, सेंधवा (मध्य प्रदेश)

७. दत्त विनायक मंदिर जनकपुरी, नवी दिल्ली

## ■ अन्य संघटन(श्रम)

१. इंटक मध्ये संघटन मंत्री (मध्य प्रदेश राज्य १९५०-५१)

२. ट्रेड युनियनों की राष्ट्रीय अभियान समिती स्थापनेमध्ये महत्वाची भूमिका

## ■ राजकीय क्षेत्र

१. भारतीय जनसंघ, मध्यप्रदेश संघटन मंत्री १९५१-५३, व दक्षिणांचल संघटन मंत्री १९५६-५७

२. राज्यसभा सदस्य १९६४-७६

३. राज्यसभा उपाध्यक्ष मंडल सदस्य, १९६८ ते १९७०

४. सदस्य, संसदीय परामर्श समिती, सार्वजनिक क्षेत्र उपक्रम

५. सचिव, लोक संघर्ष समिती, आपात्कालिन डिसेंबर १९७५ ते मार्च १९७७

६. जनता पार्टी गठन मे विशेष भुमिका

## ■ अन्य

१. अध्यक्ष : भाषा प्रचार समिती, केरळ

२. उपाध्यक्ष : श्री मा जन्मशताब्दी समिती (पाँडेचरी) (पुदूचैरी)

३. अध्यक्ष : केरळ राज्य भाषा प्रचार अधिवेशन, कोजिक्कोड, केरळ (१९४२)

४. अध्यक्ष : अखिल भारतीय विमुक्त जाती सेवक संघ, नवी दिल्ली

१. भारतीय बुध्द महासभा सदस्य

२. वनवासी कल्याण परिषद

३. भारतीय साहित्य परिषद

४. कर्मवीर हिदासजी आवले स्मारक समिती

५. प्रज्ञाभारती/प्रज्ञाप्रवाह

६. विज्ञान भारती

७. डॉ हेडगेवार जन्म शताब्दी समारोह समिती

८. आरोग्य भारतीय

९. होलकर विज्ञान कला विदूयालय (इंदौर)

१०. रामभाऊ म्हाळगी प्रबोधनी (मुंबई)

११. भारतीय कुष्ठ निवारक सेवक संघ (चांपा)

१२. विकास भारती (बिशनपुरी, बिहार)

१३. भारतीय घुमंत् जनसेवक संघ (दिल्ली)

१४. महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान (नागपूर)

१५. डॉ बाबासाहेब आंबेडकर शताब्दी समारोह समिती

१६. बैटल ऑफ पानीपत मेमोरियल सोसायटी, पानीपत

१७. दीनदयाल शोध संस्थान, नई दिल्ली

## ■ विदेश यात्रा

इजिप्त, केनिया, युगांडा, टांझानिया, मॉरिशस, दक्षिण आफ्रीका, सोवियत युनियन, फ्रान्स, स्वित्झर्लंड, बेल्जियम, हंगरी, इटली, जर्मनी, लेक्जंबर्ग, युगोस्लाविया, इंग्लड, हॉलंड, डेन्मार्क , कॅनाडा, संयुक्त राज्य अमेरिका,

मेस्किको, चीन, इंडोनेशिया, बांगलादेश, ब्रम्हदेश(म्यानमार), मलेशिया, नेपाळ, थायलंड, सिंगापुर, इस्त्रायल, फिजी, त्रिनीदाद, वेस्ट इंडिजा

## लेखक (पुस्तके)

१. एकात्म मानव दर्शन

२. कम्युनिझम अपनी ही कसौटी पर

३. प्रचार तंत्र

४. पश्चिमीकरण के बिना आधुनिकीकरण

५. राष्ट्रीय पुनर्निमाण का आधार

६. ध्येय पथ पर किसान

७. लक्ष्य एवं कार्य

८. अपनी राष्ट्रीयता

९. शिक्षा में भारतीयता परिचय

१०. भारतीय किसान

११. प्रस्तावना

१२. लोक - तंत्र

१३. श्रमिक क्षेत्र के उपेक्षित पहलू

१४. परम वैभव का संघ मार्ग

१५. चिरंतन राष्ट्र - जीवन

१६. राष्ट्रीय पुरुष छत्रपती शिवाजी

१७. विचार सूत्र

१८. पुरानी नीव नया निर्माण

१९. कम्प्युटरायझेशन

२०. हमारी विशेषतायें

२१. हमारे डॉ बाबासाहेब आंबेडकर

२२. सप्तक्रम

२३. दलित समस्या पर एक विचार

२४. संकेत रेखा

२५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एक प्रेरक व्यक्तित्व

२६. जागृत किसान

२७. हमारा अधिष्ठान

२८. एकात्म के पुजारी डॉ बाबासाहब आंबेडकर

२९. डॉ आंबेडकर और सामाजिक क्रान्ती की यात्रा

३०. राष्ट्र चिंतन

३१. राष्ट्रीय श्रम दिवस

३२. हिन्दू मार्ग (थर्ड वे का अनुवाद)

३३. कार्यकर्ता

३४. राष्ट्रीयकरण या सरकारीकरण

३५. पूर्व सूत्र (कृतज्ञ–कृतज्ञता)

## ■ इंग्रजी पुस्तके

१. परस्पेक्टिव्ह

२. हिज लिगेसी, अवर मिशन

३. मॉडर्ननायझेशन विदाऊट वेस्टर्नायझेशन

४. कन्झ्युमर विदाऊट सावरेंटी

५. थर्ड वे

६. फोकस ऑन सोशल इकॉनॉमिक प्रॉब्लेम्स

७. दि ग्रेट सेंटीनल

८. कम्प्युटरायझेशन

९. व्हाय भारतीय मजदूर संघ

१०. स्पेक्ट्रम

## ■ मराठी पुस्तके

१. चिंतन पाथेय

२. वक्तृत्वाची पूर्वतयारी

३. ऐरणीवरचे घाव

४. सामाजिक क्रांतीची वाटचाल आणि डॉ आंबेडकर

## ■ पुस्तकांसाठी दिलेल्या प्रस्तावना

१. कल्पवृक्ष

२. इंडियन प्लान्ड पॉवर्टी

३. पं. दीनदयाल उपाध्याय विचार दर्शन

४. स्वदेशी व्हुज ऑफ ग्लोबलायझेशन

५. श्रम समन्वय विचार

६. राष्ट्र

७. बडे भैय्या स्मृति ग्रंथ

८. हिंदू इकॉनॉमिक्स

९. राजकीय नेतृत्व

१०. तेजाची आरती

११. सर्वधर्म समन्वय (समन्वय महर्षि श्री गुलाबराव जी महाराज शीर्षक से)

१२. युवर ऑफीस

## ■ विषय सादरीकरण आणि भाषण

१. थर्ड वे विश्व हिंदू संमेलन, डर्बन

२. (क) ग्लोबलायझेशन : इकॉनॉमिक सिस्टम, वॉशिंग्टन येथे ग्लोबल कॉन्फरन्स ए हिंदू व्हिजन २०००

(ख) ग्लोवली इकॉनॉमिक सिस्टम फॉर ए पीसफुल वर्ल्ड ६-८ ऑगस्ट १९९३ वॉशिंटन डी सी

३. आपल्या समाजाचे भवितव्य, डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मृती समिति व्याख्यानमाला भाषण, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, महाराष्ट्र १९८५

■ **महत्वपूर्ण योगदान :**

१. राष्ट्रीय श्रमनीति

२. भारत के श्रमिकों का राष्ट्रीय

३. बद्रीनाथ, केदारनाथ एवं गंगोत्री में श्रीराम शिलापूजन का शुभारंभ

४. श्रीराम कार सेवेच्या निमित्ताने कानपूर येथे सत्याग्रह

५. दीनदयाल मेमोरियल हॉस्पिटल, पुणे

६. महामना मालवीय जयंती

७. २८ एप्रिल १९८४ रोजी बीजिंग (चीन) येथे रेडियो संदेशाचे प्रसारण

■ **विविध संघटनमधील सहभाग**

१. समालोचन, विजयवाडा - भाषण दि. १८/९/१९८८

२. प्रज्ञा भारतीय, लखनऊ - सेमीनार दि. ७/८/१९८०

३. डॉ. केशव बळिराम हेडगेवार जन्म शताब्दी समारोह (नागपुर तथा दिल्ली १९८९)

४. डॉ बाबासाहेब आंबेडकर, स्मृती दि. ६ डिसेंबर १९९०

५. एकात्म यात्रा समारोह, नागपूर (बापूराव पाकिडे एडवोकेट हाईकोर्ट, दिल्ली)

६. भारत विकास परिषद सेमिनार पंचनद (चंदीगढ)

७. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, अखिल भारतीय विज्ञान कॉंग्रेस सेमिनार, विक्रम सिंह, विद्यापीठ, उज्जैन २७ डिसेंबर १९९१

८. डॉ बाबासाहेब आंबेडकर, जन्मशताब्दी वर्ष (१४/४/१९९७) कार्यक्रम

९. होळकर विज्ञान विद्यालय इंदौर शताब्दी समारोह समिति १९९१ च्या निमित्ताने भाषण

१०. महामना मालवीय मिशन लखनौ, उत्तर प्रदेश २५ डिसेंबर १९९८ (मालवीय जयंती)

११. अखिल भारतीय दलित साहित्य सम्मेलन इंदौर (मध्य प्रदेश) दिनांक ११,१२ मे १९९१

१२. श्रीराम कारसेवा - सत्याग्रह १९९० जेल यात्रा परेड ग्राउंड, कानपूर

१३. श्रीराम कारसेवकांवर अयोध्दा येथे झालेल्या अत्याचाराच्या विरोधात भाषण ७ नोव्हेंबर १९९०, वोट क्लब, दिल्ली

१४. श्री राम कारसेवकांच्या ऐतिहासिक रॅलीच्या समारोप, बोट क्लब, दिल्ली ४ एप्रिल १९९१

१५. विश्व हिन्दू परिषद १९६० से १९७५ (दो लेख हिंदी - इंग्रजी)

१६. विषय : एक उपेक्षित हिन्दू ग्रंथ - छंद व्यवस्था, झिंदोवेस्ता - हिन्दू लॉईफ (पारसी)

१७. आदिम जाति सेवा संघ, दिल्ली

१८. श्री. कुमार सभा, बडा बाजार, कलकत्ता

१९. डॉ. हेडगेवार प्रज्ञा पुरस्कार, २७ एप्रिल १९९२

२०. विकास भारती विशुनपुर गुमला (झारखण्ड)

२१. मुंबई विश्वविद्यालयामध्ये मा. लक्ष्मणराव इनामदार मेमोरियल लेक्चर, सहकार भारती- कार्यक्रम मुंबई, भारतामध्ये सहकारीता आंदोलन, मुंबई

२२. उत्तर प्रदेश हिन्दी परिषदकडून पंडीत दीनदयाल साहित्य पुरस्कार

२३. सौराष्ट्र विश्वविद्यालय कडून सन्मान उपाधि, राजकोट

२४. सन्मित्र मंडल, नागपूर

२५. विद्या भारती - ग्वाल्हेर, मध्य प्रदेश

२६. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आर्वी (१९३५-३६) स्वयंसेवक

२७. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक १९४२ पासून प्रथम नियुक्ती केरळ मध्ये

२८. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद - विदर्भ क्षेत्र

२९. सरकारी कर्मचारी संप, १९६०

३०. सरकारी कर्मचारी संप, १९६८

३१. रेल्वे कर्मचारी संप, ८ मे १९७४

३२. जगाधरी पेपर मिल, संप नोव्हेंबर १९६३ (हरियाणा)

□□□

## ❈ परिचय :

१० नोव्हेंबर १९२० रोजी दीपावली च्या शुभदिनी नागपूर जवळच्या वर्धा जिल्हयातील तालुका आर्वी या नगरामध्ये दत्तोपंत ठेंगडी यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बापूराव दाजीबा ठेंगडी असे होते. आईचे नाव जानकीबाई होते. त्यांचे पूर्ण नाव दत्तात्रेय बापुराव ठेंगडी असे होते. परंतु ते दत्तोपंत या नावाने सर्वदूर ओळखले गेले. लहानपणी त्यांना दत्ता, दत्तु, पंत, अशा अनेक नावांनी लोक त्यांना ओळखत असत. परंतु ते स्वतः आपला परिचय दत्ता ठेंगडी असा करुन देत.

## ❈ माता, पिता व परिवार :

त्यांची आई जानकीबाई सौम्य, शांत स्वभावाच्या वात्सल्यमूर्तीच होत्या. भक्तिपरायण घरच्या संस्कारात वाढलेल्या जानकीबाई दत्तपरायण होत्या. घरसंसार सांभाळत धार्मिक व सामाजिक कार्यातही त्यांचा पुढाकार असे. अशा कामांना त्या सढळ हाताने मदत करत.

दत्तोपंतांचे वडिल बापुराव त्यांच्या वेळचे प्रसिध्द वकील होते. दिवाणी व फौजदारी दोन्ही प्रकारचे दावे चालविण्यात त्यांचा हातखंडा होता. आपल्या व्यवसायात परिश्रम करुन त्यांनी आपली व आपल्या परिवाराची आर्थिक व सामाजिक उन्नती साध्य केली होती. यामुळे आर्वी गावामध्ये त्यांना प्रतिष्ठा होती.

## ❈ जन्मकथा :

परंतु त्यांच्या मनात एक शल्य होते. अन्य सुख सोयी असूनही त्यांना मूलबाळ नव्हते. जानकीबाई प्रखर दत्तभक्त होत्या. त्यांनी मनोमन देवाला साकडे घातले. अपत्य सुख मिळावे व अपत्य निरोगी, दीर्घायुषी व्हावे, हवे तर माझे बाळ देवकार्य करु दे. भक्ती भावाने केलेली प्रार्थना भगवान दतात्रयांपर्यंत पोहोचली. लवकरच पाळणा हालला. घरात पुत्ररत्न जन्माला आले. देवाच्या कृपेने जन्मलेल्या या मुलाचे नामकरण दत्तात्रय असे झाले. तोच मुलगा पुढे दत्तोपंत ठेंगडी या नावाने विख्यात झाला. भगवान दत्तोत्रयांप्रमाणे देशकार्य हे देवकार्य मानून वयाच्या ८४ वर्षांपर्यंत नित्य नमन करणाऱ्या दत्तोपंतांनी आपले दत्तात्रय हे नाव सार्थक केले. घर, गृहस्थी, विवाह, आदी ऐच्छीक सुखांचा त्याग

करुन ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक बनले व ऋषीतुल्य जीवन जगले. आयुष्यभर हीन, दीन, उपेक्षित व वंचित लोकांच्या उत्थानाचे प्रयत्न त्यांनी केले. सारे आयुष्य ते साधेपणाने जगले व त्यांनी भगवान दत्तात्रेयांचा आशिर्वाद सार्थ केला.

### ❈ विद्यार्थी जीवन :

त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आर्वीमध्ये झाले. आर्वीच्या म्युन्सिपल हायस्कुल चे अग्रणी विद्यार्थी होते व आपल्या प्रतिभावान गुणामुळे व कुशाग्र बुध्दीमुळे ते चमकले. ते नेहमी पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होत. परंतु त्यांचे बालपण केवळ पुस्तकी नव्हते. एकदा वाचून लक्षात ठेवणारे ते एकपाठी होते. त्यांची स्मरणशक्ति त्या वयातही विस्मयकारी होती. पुढच्या जीवनांतही त्याचा पदोपदी प्रत्यय येत राहिला. परंतु अभ्यासा व्यतिरिक्तही त्यांचे वाचन अफाट होते. हायस्कूलचे वाचनालय व आर्वीचे प्रसिध्द लोकमान्य टिळक वाचनालयातील अनेकविध पुस्तके त्यांनी मॅट्रीक परीक्षेआधी वाचून संपविली होती. त्यांच्या हायस्कूलच्या हेडमास्तरांनी नंतर सांगितले की, मोठे मोठे ग्रंथ सुध्दा हा दत्तु एक दिवसांत वाचून संपवत असे व त्यातील महत्वपूर्ण संदर्भ त्यांना कायमचे स्मरणात रहात असत.

त्यांचे काळी नागपूरात वक्तृत्व स्पर्धा प्रतिवर्षी होत व आर्वी हायस्कूल कडून भाग घेत, जिंकणार आणि आर्वी हायस्कुलचे ठेंगडी.

आर्वी हायस्कूलच्या एका वादविवाद स्पर्धेचा विषय होता माझा आवडता पालक, केवळ अकरा वयाच्या दत्तु ने माता महात्म्याचे असे सखोल व प्रभावी निरुपण केले की ते ऐकून भलेभले धन्य झाले. हा मुलगा मोठा होईल असे परिजनांनी भाकित केले. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात, ही उक्ती त्यांनी सार्थ केली. पूर्ण आयुष्यात त्यांनी संसद, सभा, विदेश दौरे चिंतन शिबिरे अभ्यासवर्ग अशा हजारो प्रसंगी श्रोत्यांना प्रभावित केले. त्यातुन नवा विचार, नवे चैतन्य, प्रस्तुत केले. भारताच्या सामाजिक जीवनाला वाणी व कृती सामर्थ्याने विधायक दिशा प्रदान केली.

## ❋ स्वातंत्र्य आंदोलन :

१९३१-३२ मध्ये देशभरात म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याचे आंदोलन सुरु होते. त्यावेळी दत्तोपंताचे वय १२ होते. त्या किशोर वयांत त्यांनी स्थानिक सामाजिक संघटना सुरु केल्या होत्या. वानर सेना, जुग्गी झोपडी मंडळ, पुअर बॉईज कमेटी, आर्वी विद्यार्थी संघ इत्यादीच्या माध्यमातून या स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी मोठा सामाजिक सहभाग निर्माण केला.

आंदोलनाने आर्वीमध्ये खूप तणाव होता. त्यामध्ये भयंकर ऊन, पण त्याची पर्वा न करता सफेद टोपी घालून  हा मुलगा चळवळीमध्ये मदत करण्यासाठी चौकाचौकामध्ये हजर असे. वडील वकील होते. त्यांना परिस्थितीची चांगली कल्पना होती. त्यांना आपल्या लाडक्या मुलाला समजावुन पाहिले पण मागे हटतील तर ते दत्तोपंत कसले!

शेवटी एके दिवशी चौकातुन बखोटयाला धरुन वडील घरी घेऊन आले. म्हणाले, दत्तु, उद्यापासून घराबाहेर पडायचे नाही. आपला हात सोडवून, दत्तू बाहेर पळाला. वडिलांना खूप राग आला. दत्तुच्या आईला म्हणाले, ऐका दत्तु आज बेशिस्त करुन गेला. सांगून ऐकत नाहीतर आज त्याचे जेवण बंद करा.

उन्हाळयाचे दिवस, सकाळपासून मूल उपाशी, आईचे हृदय विव्हल झाले. जानकीबाईंनी दत्तूला बोलावून म्हटले बाळा हट्ट सोड, वडीलांचे ऐक, दत्तु म्हणाला, आई आपला देश इंग्रजांचा गुलाम आहे. तो स्वतंत्र झाला पाहिजे, मी आंदोलनात जाईनच. उपाशी रहावे लागले तरी चालेल, पण मी चळवळ नाही सोडणार.

त्यादिवशी दत्तु उपाशी झोपला. आणि त्याची मायमाऊली पण. बाळ उपाशी असताना आईच्या घशाखाली घास कसा उतरेल?

## ❋ लोकसंग्रह :

मित्र बनविणे हे दत्तुच्या रक्तातच होते. **'जे का रंजले, गांजले त्यासी म्हणे जो आपुले'**, ही तुकाराम महाराजांची उक्ती दत्तोपंतांनी बाळपणीच साकारली होती. जीवनभर त्यांचे तेच सूत्र राहिले. त्यांचे बालपणीचा बहुतेक वेळ गरीब, झोपडीवासी, दुःखी, पीडीत यांचे मध्येच जात असे. स्वतः संपन्न घरचे असूनही

नेहमी त्यांची मित्रमंडळी सर्वहारा कुटुंबामधलीच होती. त्यांच्या जीवनाच्या अडीअडचणी हाच त्यांच्या मैत्रीचा धागा होता.

## ❖ विद्यार्थी जीवनातला अज्ञात वास :

विद्यार्थी जीवनांतच ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक बनले. सकाळी आखाडयात जावून व्यायाम दंड, बैठक, कुस्ती करत व सायंकाळी संघ शाखेवर कबड्डी, खो खो चे खेळ चालत.

९,१०,११ वी च्या विद्यार्थ्यांसाठी हायस्कुलचे स्नेहसंमेलन होत असे. त्याच्या समितीच्या सचिव पदी दत्तु निवडून आला. संघ द्वेषी एका व्यायाम शाळेच्या विद्यार्थ्यांनी समर्थ शाखेच्या स्वयसेवकांना मारहाण केली. पण प्रकरण पोलिसांत गेले. दत्तुवर वॉरंट निघाले. वडिलांना स्थिती माहिती होती. ते स्वतः फौजदारी वकील होते. त्यांनी ३ महिने मुलाला अज्ञातवासात धाडले. दरम्यान वॉरंट व केस दोन्ही निकाली काढले व नंतर परीक्षाही निर्विघ्न पार पडली.

हा अज्ञातवासाचा शालेय जीवनातला अनुभव, त्यांना १९४८ च्या संघबंदीच्या वेळी आणि १९७५ च्या आणिबाणीच्या वेळी खूप मदत करुन गेला. दोन्ही बंदींच्या काळात ते शेवटपर्यंत भुमिगत राहीले. कधीच सापडले नाहीत. इदिरा गांधी सरकारचे पोलिसदल देशभर त्यांना शोधत राहीले. त्यांच्या हातावर तुरी देत, ठेंगडींचा अव्याहत प्रवास सुरु राहिला. आणीबाणी हटविण्याचा दबाव त्यांच्या लोकाधिकार समितीच्या चळवळीमुळे तयार झाला. त्याचे पूर्ण श्रेय ठेंगडीजींच्या प्रयत्नांना जाते.

## ❖ नागपूरचे उच्च शिक्षण :

माध्यमिक शिक्षण आर्वीमध्ये उत्तम प्रकारे पूर्ण करुन हा हुशार मुलगा आता नागपूरच्या मॉरीस कॉलेजमध्ये दाखल झाला. त्या काळात मॉरीस कॉलेज खुपच पुढारलेले होते. परंतु फॅशन, झगमगाट यापासून खुपच दूर असलेला व प्रसंगी गबाळा दिसणारा हा दत्तु आपल्या शोषित, पीडीत मित्रांमध्ये तेथे ही **वेष असावा बावळा, परी अंतरी नाना कळा** या उक्तीला सार्थ ठरविणारा दत्तु मॉरीस कॉलेज मध्ये आपल्या कुशाग्र बुध्दी, अफाट वाचन, प्रभावी भाषण या श्रेष्ठ गुणांमुळे वेगळा, प्रभावी व प्रसंगी धाक वाटावा असा बनला. पदवी

नंतर त्यांनी कायद्याची परीक्षा नागपूर मधुनच दिली. व अव्वल गुणांनी त्यांनी पदवी प्राप्त केली.

## ❈ प.पू. श्री गुरुजींचा सहवास :

आर्वीमधुन नागपूरला दत्तोपंत ठेंगडी आले. तेव्हा त्यांची निवासाची व्यवस्था, रा.स्व. संघाचे सरसंघचालक परम पूजनीय श्री माधव सदाशिव गोळवलकर (प.पू श्री गुरुजी) यांचे घरी झाली. प.पू. श्री गुरुजींनी या मुलावर पुत्रवत प्रेम केले.

रात्री उशीरापर्यंत चालणाऱ्या गाठीभेटी मुळे त्यांची सकाळी कॉलेजला जाण्याची नेहमी घाई सुरवातीला होत असे. सायंशाखा, नंतर स्वयंसेवकांच्या गाठीभेटी व नंतर कॉलेजचे मित्र, दलीत वस्त्यांमधील भ्रमण असा त्यांचा संपूर्ण दिनक्रम त्यावेळी होता. तोच क्रम पूर्ण आयुष्यभर त्यांनी जतन करुन ठेवला.

परंतु घराच्या गच्चीवर पसरलेले अंथरुण व पांघरुण आवरुन कॉलेजला जाणे याची सुरवातील सवय नव्हती. काही दिवसांनी त्यांच्या लक्षात आले की, आपला हा पसारा रोज सकाळी स्वतः श्री गुरुजीच आवरुन ठेवतात. श्री गुरुजींचा धाक साऱ्या संघ स्वयंसेवकांना ठाऊक होता. परंतु हा मायेचा वर्षाव व पित्याच्या स्नेहाचा अनुभव घेतलेले दत्तोपंत ठेंगडी, आयुष्यभर संघ जगले. सर्व देशभर श्री गुरुजींचे मानसपुत्र अशी संज्ञा त्यांना संघ सृष्टीने दिली होती. ती त्यांनी आपल्या आचरणाने सार्थ केली.

श्री गुरुजींच्या सहवासात राहून त्यांनी संघ विशेषता जाणुन घेतल्या व त्या जीवनांत उतरविल्या. या मधुनच राष्ट्र निर्माणाच्या संघ कार्यात प्रगाढ राष्ट्र भक्तिभाव घेऊन दत्तोपंत ठेंगडी उतरले. उच्च आदर्श, ध्येय समर्पित जीवनाशी जोडलेली विचारधारा व भारतीय संस्कृतीची श्रेष्ठ परंपरा, सिध्दांत व तत्वचिंतन यांचा सुरेख संगम त्यांनी आपल्या जीवनांत उतरविला. देशभरातील विविध संस्थांच्या हजारो कार्यकर्त्यांना त्यांनी आपल्या व्यक्तित्वामधुन प्रेरणा दिली.

## ❈ संघाचे प्रचारक :

कायद्याचे औपचारिक शिक्षण व संघाचे तृतीय वर्षाचे शिक्षण दोन्ही पूर्ण केलेला हा २१ वर्षांचा तरुण आपले सर्वस्व भारतमातेच्या चरणी अर्पण करण्यास आता सज्ज झाला होता.

प.पू श्री गुरुजींच्या घराचा एक घटक बनलेला तरुण, प्रचारक न बनला तर नवलच. १९४२ ला त्यांनी आपले मन निश्चित केले खरे.

पण आर्वीला राहणाऱ्या मातापिता यांची औपचारिक सहमती पण मिळवायला हवी होती.

केवळ १७ वर्षे झालेल्या एका संस्थेमार्फत देशकार्य करायला निघालेल्या मुलाच्या वडिलांची मानसिकता अनुकूल कशी असेल?

बरे! हे देशकार्य म्हणजे केवळ एक प्रभात फेरी काढणे किंवा सत्याग्रह करुन काही दिवस तुरुंगवास सोसून मग पुढारपणा करण्याइतके सहज नव्हते. तसे कार्य तर बालपणांत आर्वीला लहान दत्तु करतच होता.

रा.स्व. संघाच्या प्रखर राष्ट्रभक्ती मार्गांना जीवनाच्या सुख, सोयी, घर संसार, लग्नकार्य, नातेवाईक, आईवडील या सर्वांचा त्याग करुन संन्यस्त बनुन भगवी पताका रोवण्यासाठी व निद्रिस्त समाजाला जागृत व एकसंध बनवण्यासाठी जीवनभर रात्रंदिवस प्रयास करण्याची ही अनोखी देशसेवाच होती.

संघाच्या स्थापनेपासुन असे हजारो तरुण प्रचारकी जीवनाच्या निखाऱ्यावरुन जीवनाची वाटचाल करीत आले आहेत. ज्याला जितके जमेल त्याने तितके आपले आयुष्य देशकार्यासाठी अशा पध्दतीने लावले आहे.

काही थोडया काळासाठी असे काम करून गृहस्थी जीवनांत परतून आले तर काही जीवनाच्या अंतापर्यंत त्याच तळमळीने प्रखरतेने मार्गक्रमण करीत राहीले. कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यु ही विश्रांती, ही उक्ती काही निवडक व्यक्तींनी सार्थ केली.

श्रध्देय स्वर्गीय दत्तोपंत ठेंगडी हे असेच सर्वार्थाने राष्ट्रजीवन जगले. १९२० पासून सुरु झालेल्या या अलौकीक जीवनाचा शेवट १४ ऑक्टोंबर २००४ या दिवशी पुण्यात येथे झाला.

त्या काळची प्रतिकुलता व जनमानसाची अनभिज्ञता लक्षांत घेता, घरची स्थिती वडीलांची मानसिकता ठीक रहावी म्हणुन दत्तोंपंतांनी घरी सांगितले की मी एक वर्ष प्रचारक म्हणून जाणार आहे व नंतर घरी परतून येईन. स्व ठेंगडी कधी कधी गंमतीने म्हणत असत की मी एक वर्ष प्रचारक निघणार असे सांगुनच प्रचारक निघालो हे सत्यच आहे. फक्त आमचे ते वर्ष अजुन संपायचे आहे.

## ❋ वडीलांची नाराजी :

कायद्याची पदवी मिळाल्यावर नागपूर मधुन दत्तोपंत ठेंगडीनी प्रचारक निघण्याचे ठरविले आहे. याची कुणकुण त्यांचे वडील श्री बापूजी ठेंगडी यांना लागली. ते भयंकर संतापले. मुलगा वकिलीची पदवी घेऊन घरी येईल. आपली वकीली पुढे घालवेल, संसार करील, सुनमुख पहायला मिळेल. एवढा हुशार मुलगा आपली वकीली नक्कीच चांगली चालविल. नांव, पैसा, मान मरातब मिळविल ही त्यांची अपेक्षा व अंदाज खराच होता.

बापूजी ठेंगडींनी त्यांच्या सौ ना सुनावले. तुमच्या लाड प्रेमाने दत्तु बिघडला आता तो बापाचे ऐकत नाही. दत्तुचा तो पुढारी नागपूरात बसला आहे. त्याचे तो ऐकतो. पण मी हे चालू देणार नाही. मी त्याला प्रचारक बनण्याची मुळीच अनुमती देणार नाही. जानकीबाई विनम्रभावाने म्हणाल्या, आपला दत्तु, भगवान दत्तात्रेयांच्या आशीर्वादाने झाला आहे. त्याला त्यांचाच अनुग्रह आहे. त्यांचेच कार्य तो करील. नागपूरांत गुरुजींनी त्याचे गुण व प्रज्ञा पाहिली असेल. म्हणूनच ते त्याला प्रचारक बनवून केरळला पाठवित आहे. आपण त्याला अनुमती दृयावी. पण बापूजींचा निग्रह ठाम होता. नागपूरांतून प.पू श्री गुरुजींनी, संघाचे वरिष्ठ अधिकारी श्री कृष्णराव मोहरिल यांना आर्वीला पाठविले. ते म्हणाले, कृष्णराव माझा एक प्रचारक हातून घालवू नका. कसेही करुन बापूजींची अनुमती घेवून या. हा प्रचारक मला हवा आहे.

## ❋ कृष्ण शिष्टाई :

आर्वीच्या नगर संघचालक अण्णासाहेब देशपांडे यांना घेवून कृष्णराव बापूजींना भेटले. त्यांना पाहताच बापूजी कडाडले, मी दत्तुला प्रचारक जावू देणार नाही, विषय संपला !!

कृष्णराव म्हणाले, आपण वडील आहात. सर्व समजता दत्तात्रेयांच्या नवसाने पुत्ररत्न प्राप्त झाले म्हणून तुम्ही त्याचे नाव दत्तु ठेवले. पण तो त्यांचेच कार्य जगभरांत करणार. दत्ताला देवघरांत कोणी कोंडून ठेवतात का? हा विचार करा. तुमचा मुलगा प्रतिभावान आहे, बुध्दीमान आहे. चांगल्या वाईटाची पारख करुनच त्याने त्याच्या आयुष्याचा निर्णय केला आहे. तो आता सज्ञान आहे. तो

स्वतः निघण्याचा निर्णय करील, त्यापेक्षा आपण आशिर्वाद देऊन पाठविले तर सर्वांचाच त्यात सन्मान आहे. मला जे बोलायचे ते बोललो, आता आपण विचार करा. मी निघतो.

बापूजी म्हणाले, आता कोठे जाता? कृष्णराव म्हणाले, तुमचा पुष्कळ राग मिळाला. आता अण्णासाहेबाकडे जावून दोन घास जेवतो आणि नागपूरास निघतो.

बापूजी म्हणाले, दुपारी एक वाजता देशपांडेंना घेऊन घरी या जेवायला. सौ जानकी बाईंना म्हणाले, आज साऱ्या गोतावळयास घरी जेवायला बोलावा. बापूजींना भावना अनावर झाल्या.

पंधरा दिवसांनी बापूजी व सौ बाई (जानकीबाई) नागपूरला पोचले. त्यांनी गुरुजींना श्रीफळ देऊन, पुष्पमाला देऊन म्हटले. आज माझा दत्तु मी तुमच्या ओटीत घालतो आहे. त्याचा संभाळ करा, आता तो तुमचा आहे. पण एवढीच अपेक्षा आहे, त्याने घर तोडू नये. येत जात रहावे.

त्यानंतर लगेचच २२ मार्च १९४२ ला प्रचारक बनून केरळकडे मार्गस्थ झालेले, स्व. श्रध्देय दत्तोपंत ठेंगडीचा **चरैवैती, चरैवैती** हा जीवन यज्ञ अखंड मृत्युपर्यंत चालला.

त्यांच्या एका घरच्या भेटीमध्ये, त्यांनी आपल्या मातेस म्हटले, हे प्रचारकी जीवन असेच शुध्द सात्विक रहावे व त्यामध्ये स्खलन होवु नये याची मला नेहमी चिंता रहाते. त्यांच्या मातोश्रींनी त्यांना आश्वस्थ केले. त्या म्हणाल्या, असे काही होणार नाही याची खात्री बाळग, आणि समजा असा प्रसंग आलाच तरी माझी तपस्या आहे, त्याचे कवच तुला अशाही संकटातुन पार करुन नेईल.

## ❊ संघ बंदी व क्रम परिवर्तन :

१९४२ ते १९४४ या काळात केरळमध्ये व नंतर १९४४ ते १९४७ पर्यंत बंगाल व आसाम प्रांतामध्ये ठेंगडी यांनी मोठया कष्टाने संघ कार्याची पाया भरणी केली. दोन्ही प्रान्तांच्या भाषा, मल्याळी व बंगाली, आत्मसात केल्या. या दोन ही प्रांताच्या संघ कार्याशी त्यांची नाळ अखेरपर्यंत जुळुन राहीली.

स्वातंत्र्यानंतर लगेचच झालेल्या महात्मा गांधी यांच्या हत्येच्या आरोपाखाली १९४८ ला भारत सरकारने रा. स्व संघावर बंदी घातली. प. पू. श्री गुरुजींना तुरुंगवास घडला. दीड वर्षाच्या त्या कष्टदायक कालखंडामध्ये हजारो स्वयंसेवकांनी संघ बंदी विरुध्द सत्याग्रह केला. तुरुंगवास सोसला, शेवटी सरकारला बंदी हटवावी लागली. या काळात ठेंगडी भूमिगत राहून संघकार्य सांभाळण्याच्या प्रयत्नात होते.

परंतु जी जनतांत्रिक रचना भारताने स्वीकृत केली होती त्यामध्ये संघासारख्या सांस्कृतिक संघटनेच्या समस्यांची उत्तरे प्राप्त करणे शक्य नव्हते.

त्यासाठी समाजाच्या विविध घटकांना स्पर्श करणारे जनसंघटन निर्माण करणे आणि राष्ट्रवादाची परिभाषा असणारा राजकीय पक्ष निर्माण करणे जेणेकरून भारतीय सांस्कृतिक राष्ट्रवाद सर्वव्यापी व प्रभावी होईल याची जाणीव रा. स्व. संघाला झाली.

चांगल्या चारित्र्यांची, निःस्वार्थी, देशभक्त व समर्पित व्यक्तींची निर्मिती संघ करील व अशा व्यक्ती समाजाच्या विभिन्न क्षेत्रांत जावून आपल्या गुणवैशिष्ट्यांनी भारतीयत्वाची प्रस्तुती करणाऱ्या संस्था व संघटना यांचे जाळे उभे करतील असे चिंतन उदयास आले.

क्षेत्रानुरुप जनसंघटना उभ्या राहतील व कामांचा विस्तार होईल. पण त्याचवेळी या संस्था/संगठना स्वायत्त व स्वयंअनुशासीत पध्दतीने काम करतील. राष्ट्रभक्तिचा मुळ विचार सर्वांचा एक सारखा पण क्षेत्रानुरुप कार्यपध्दती भिन्न राहील. अर्थातच संघबंदीसारखा आततायी प्रयत्न पुन्हा झाला तरी विचार अक्षुण्ण राहील. नव्या व्यवस्थेत व सुरक्षा कवच बनेल अशी ढोबळ रचना स्फुटीत पावली.

या सर्व प्रयत्नांच्या केंद्रात राष्ट्रनिति असेल राजकारण असणार नाही हा मूलभूत व पायाभूत फरक अद्वितीय होता व देशकालपरिस्थिती निरपेक्ष हे कार्य केवळ विजयीच होईल याची ग्वाही देणारा होता.

१९४८ ची संघबंदीचा आघात रा.स्व.संघाने स्वतःच्या हिंमतीवर, स्वयंसेवकांच्या अपूर्व त्यागामुळे परतवून लावला.

यानंतरच्या दुसऱ्या संघ बंदीच्या १९७५ च्या संकटाला संघ व समविचारी संघटना यांनी इतरांच्या मदतीने परास्त केले. रा.स्व.संघ या भारताच्या राष्ट्रवादी संघटनेला आता भविष्यात कोणी बंदी घालून संपविण्याची भाषा करु शकेल असे भरतभूवर कोणी नाही आणि अशी भाषा कोणी केलीच तर त्याला आता समाजच पुढाकार घेवुन शुन्यवत् करील असा या रचनेचा विस्तार वाढला आहे.

परंतु या विस्तार उन्मुख नव्या व्यवस्थेचा विचार १९४८ च्या संघ बंदीच्या वेळीच झाला व विभिन्न क्षेत्रांत राष्ट्रवादी विचारांची सामाजिक कामे सुरु करण्याचे प्रयत्न सुरु झाले. अशा अनेक प्रयत्नांच्या केंद्रामध्ये दत्तोपंत ठेंगडी राहिले. १९४९ ला अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची निर्मिती झाली.

### ❋ भारतीय मजदूर संघाची स्थापना १९५५ :

नागपूरच्या वास्तव्यांत स्व. श्रध्देय ठेंगडींनी पोस्ट व टेलिफोन मधील कम्युनिस्ट महासंघ व खाणींमध्ये काम करणाऱ्या इंटक चा महासंघ यामध्ये काम करुन श्रमिक क्षेत्राचा कार्यानुभव घेतला होता. त्यामुळे श्रमिक क्षेत्रात राष्ट्रवादी श्रम संघटनेची स्थापना करण्यासाठी स्वाभाविक निवड श्रध्देय ठेंगडी यांचीच झाली.

देशामधल्या विभिन्न ठिकाणी श्रमक्षेत्रांत काम करणारे २८ कार्यकर्ते स्व. श्रद्धेय ठेंगडी यांच्या समवेत लोकमान्य टिळक जयंती च्या शुभ मुहुर्तावर २३ जुलाई १९५५ ला भोपाळ येथे एकत्र झाले. पुढे जाऊन अ.भा.अध्यक्ष बनलेले स्व मा. रमणभाई शहा त्यापैकी एक होते. सर्वश्री कुशाभाऊ ठाकरे, वामनराव परब, जगदीश प्रसार माथुर, हे मार्गदर्शनासाठी आमंत्रित होते. कामगारांनी कामगारांची चालविलेली केंद्रीय श्रम संघटना बनवावी व ती राजकारण निरपेक्ष असावी, राष्ट्रकारणासाठी काम व्हावे, काम व्यक्ति निरपेक्ष करावे, सामुहिकता त्याचा आधार बनावा तसेच श्रम हीच आराधना घोष वाक्य करावे व मुष्टीचक्र व गव्हाची लोंबी यांनी अंकित भगवा झेंडा असावा वगैरे तपशीलासह संघटनेचे नाव भारतीय मजदूर संघ असावे असे सारे प्रस्ताव या सभेने स्वीकृत केले. अ.भा. संयोजक या नात्याने श्रध्देय स्व. ठेंगडी यांची एकमताने निवड करण्यात आली.

पद, पैसा, प्रतिष्ठा यांचे पलिकडे जाऊन श्रमाला सन्मान देणारी व्यवस्था निर्माण व्हावी व त्यासाठी राष्ट्रभक्त श्रमिकांनी संघर्षक्षम भा.म.संघाची निवड

करावी असे आवाहन भारतीय मजदूर संघाने केले व त्याच सायंकाळी भोपाळ येथील जाहिर सभेमध्ये स्व. श्रध्देय ठेंगडी यांनी हे आवाहन देशाच्या श्रमिकांसमोर ठेवले.

### ❈ १२ वर्षांची भ्रमणगाथा :

सारे श्रम क्षेत्र आधीच व्याप्त झालेले. मोठे नेते, मोठे नांव, मोठा पैसा, मोठया संघटनांचा ताफा, प्रचुर संसाधन, अशा साऱ्या गलबल्यामध्ये भा.म.संघाचा नवा झेंडा, नवा विचार घेवून हा संयोजक देशभ्रमणाला निघाला. ना जवळ पैसा ना संसाधन फक्त जवळ होता तो विजयी विचार व विजयाचा निर्धार. अशा विपरित स्थितीत निर्धाराने हिमतीने, कष्टाने रात्रीचा दिवस करुन या महापुरुषाने यज्ञ मांडला. भा.म.संघाच्या छोटयाश्या रोपाला रक्त व घामाचे अहोरात्र सिंचन करुन, त्याचे वटवृक्षामध्ये परिवर्तन केले.

मोठया पुढाऱ्यांचे भले होते आहे. राजकीय पक्षांची श्रमिक मतपेटी बनतो आहे, तत्वविहीन तडजोडीमुळे श्रमिकांची लुबाडणुक होत आहे, विवेकशून्य नेत्यांमुळे कष्टकरी जनता नागवली जात आहे, असे श्रम क्षेत्राचे चित्र पालटायचे असेल तर इमानदार नेतृत्वाचा सेवा भाव हवा. बाहेरील व राजकीय हस्तक्षेप दूर व्हायला हवा. हे सोप्या भाषेत त्यांनी १९५५ ते १९६७ च्या १२ वर्षात भारतीय श्रमिकाला समजावून सांगीतले. तसे काम करणारे कार्यकर्ते ठिकठिकाणी उभे केले. या कार्यकर्त्यांभोवती कामाचे जाळे उभे झाले व त्यामुळे नवे कार्यकर्ते येऊ लागले. प्रामाणिकपणा व सेवाभाव यांचा अनुभव घेऊन नवी सदस्य संख्या उभी राहिली. वर्ण संघर्षाचे थोतांड त्यांनी उलगडून दाखविले. भारताचे वर्ग संघर्षाचे पाठीराखे केवळ थोतांडमार्तंड नव्हते. ते तर राष्ट्र संकल्पनेचा पोथीबध्द विरोध करण्याच्या मार्क्सवादी प्रयत्नांत विदेशी शक्तींच्या हातचे बाहुले झाले होते. विदेशी तत्वज्ञान, विदेशी मार्गदर्शन व विदेशी पैसा यांच्या दुष्प्रभावांचा चटका भारताला १९६२ च्या चीन युध्दात बसला.

कम्युनिस्ट कृष्ण मेनन सारखा देश विधातक माणूस देशाचा संरक्षण मंत्री बनला होता, तर लाल झेंडेवाले चीन ची मुक्तिसेना भारतात येत असल्याच्या देशद्रोही घोषणा श्रमिकांसमोर करीत होते.

भारत संकटात होता. चीनी आक्रमणांसमोर भारताचा पराभव झाला. नेहरु सरकार हतबल झाले. आता लाल भाईंना कोण लगाम घालणार?

## ❖ मुंबई बंद व कम्युनिस्टांची माघार :

श्रमिकांच्या राष्ट्रभक्ती चे उद्‌गाते स्व दत्तोपंत ठेंगडी नागपूर वरुन निघाले. मुंबईत तळ ठोकून बसले. हिंद मजदूर सभा, हिंद मजदूर पंचायत, भारतीय मजदूर संघ यांनी कम्युनिस्टांना वगळून टेक्सटाईल श्रमिकांचे आंदोलन उभे केले. महागाई निर्देशांक चुकीचा आहे. त्यांचे पुनर्मूल्यांकन व्हावे यासाठी ९ ऑगस्ट १९६३ चा दिवस मुंबई बंद साठी निश्चित केला. मधु लिमये, एस आर कुलकर्णी, बाळ दंडवते, नानासाहेब गोरे, यांनी नेतृत्व केले. राष्ट्रहितासाठी उभी केलेली मजदूर आघाडी टिकावी म्हणून दत्तोपंत ठेंगडी यांनी त्यांची मनधरणी केली, पडते घेतले. कै रमणभाई शहा व कै किशोर देशपांडे यांनी मुंबई पिंजुन काढली. बंद यशस्वी झाला. महाराष्ट्र सरकारने  लकडावाला समितीची स्थापना केली. २७ अंक भत्ता निर्देशांक वाढ मिळाली. या मधुन श्रमिकांना श्रम क्षेत्रात प्रथमच भारत माता की जय च्या घोषणा संयुक्त मंचावरुन ऐकू आली. बंगाल व कानपूर सह उत्तर प्रदेश आदी प्रदेशांत चीनी आक्रमणाचा विरोध करणारी संयुक्त चळवळ श्रम क्षेत्रांत स्थापित झाली.

अत्यल्प जनसमर्थन असणाऱ्या भा.म.संघाने त्या संकटाच्या काळात आपल्या राष्ट्रभक्ती चा परिचय श्रमिकांना दिला. भारतीय श्रमिक मुळातून राष्ट्रभक्त आहे व तो एका राष्ट्रभक्त मार्गदर्शनाची वाट पाहतो आहे याची प्रचिती यानंतर पदोपदी येऊ लागली. रेल्वे, संरक्षण, खाणी, केंद्र सरकारी कर्मचारी, पोस्ट, बँक, टेलिफोन यांचे महासंघ उभे राहिले.

बारा वर्षे अखंड प्रवास, चिंतन, मार्गदर्शन, संघर्ष या सर्व शक्य मार्गांनी देशभर ठेंगडींनी कामाचे जाळे कार्यकर्त्यांच्या मदतीने उभे केले. या प्रयत्नांत अनेकदा उपेक्षा, द्वेष व अपमान त्यांनी सहन केले.

याच कालखंडात स्व. श्रध्देय दत्तोपंत ठेंगडी यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या समवेत काम केले. त्यांच्या पहिल्या लोकसभा निवडणुकीमध्ये ठेंगडीजींकडे डॉ बाबासाहेबांच्या निवडणुकीची व्यवस्था होती. ठेंगडीजींचे संबंध

डॉ. आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर ही शेड्यूल कास्ट फेडरेशन बरोबर जवळचे व आत्मीयतेचे राहीले.

### ❊ १९६७ – पहिले अधिवेशन नवी सुरवात :

भा.म.संघाच्या दिल्ली येथील पहिल्या अधिवेशनांत देशाच्या १८ प्रदेशामधून ५४१ संगठनांचे १३५२ प्रतिनिधी हजर होते. बारा वर्षे संयोजक पदी काम केलेल्या व एकहाती उभ्या केलेल्या भा.म.संघाचे पहिले निर्वाचित सरचिटणीस म्हणून त्यांची एकमुखाने निवड झाली. दोन लाख सेहेचाळीस हजार इतकी सदस्यता झाली होती. आठ महासंघ सोबत होते. पहिल्या अधिवेशनाचे प्रमुख पाहुणे थोर दलित नेता स्व. दादासाहेब गायकवाड होते. लवकरच सदस्यता ५ लाखांवर पोचली.

श्रमिकांच्या पाठींब्यावर भा.म.संघाने सर्व मानके अर्जीत केल्याने केंद्रीय श्रम संघटना या नात्याने देशात मान्यता मिळावी यासाठी त्या नंतर भा.म.संघाने दिल्लीत निदर्शने केली. राष्ट्रपतींना निवेदन दिले.

या दरम्यान जनसंघाच्या मदतीने ठेंगडींजी राज्यसभेवर निवडून गेले. पण राजकारण निरपेक्ष राहण्याची भूमिका घेणाऱ्या दत्तोपंतांनी राज्यसभेची जागा निर्दलीय अशी नोंदली होती.

त्यांचा दिल्लीतील सरकारी निवास आता भा.म.संघाचे केन्द्र कार्यालयच झाले होते. कार्यकर्ते सतत येत. मुक्काम करत. सर्व दिवसभराची कामे संपवून गाठीभेटी करुन अपरात्री मुक्कामाला आल्यानंतर निवासांत झोपायला जागा नाही अशामुळे स्वतःच्या खासदार निवासाच्या हिरवळीवर झोपलेले स्व. श्रध्देय दत्तोपंत ठेंगडी त्यांच्या ऋजुता, सहनशीलता, मार्दव, निर्भेळ स्नेह, आपुलकी व सहृदयता या अलौकिक गुणांमुळे कार्यकर्त्यांच्या हृदयात विराजमान झाले.

जसे घरी तसेच सर्वदूरी अशा पारदर्शी व्यक्तित्वाच्या ठेंगडीजींनी अनेक समाज धुरीणांना आपल्या स्नेहसुत्रात बांधले होते.

राष्ट्रपती व्ही व्ही गिरी यांच्या विशेष आग्रहावरुन ते रशियाला जाणाऱ्या खासदारांच्या मंडळांत निवडले गेले. श्रीपाद डांगे, हिरेन मुखर्जी, पी राममूर्ती,

भूपेश गुप्त, बानी देशपांडे व इतर डाव्या नेत्यांशी त्यांचे पारिवारीक संबंध होते.केरळचे कम्युनिस्ट संस्थापक के दामोदरन त्यांचेकडे कामाला येत असत.

भा.म.संघाच्या मुंबईमधील तिसऱ्या अ.भा.अधिवेशनात उद्घाटनासाठी गोदी कामगारांचे एच एम एस चे एस आर कुलकर्णी १९७२ मध्ये आले होते. १९७५ ते १९७७ च्या आणीबाणी काळांत भूमिगत चळवळीची सूत्रे शेवटचे वर्ष त्यांच्याकडे आली होती. देशभर पोलिसांचा पहारा धुडकवून जेलमध्ये बंद झालेल्या नेत्यांच्या त्यांनी गाठीभेटी केल्या.

मोरारजी, चरणसिंह, डॉ स्वामी, चन्द्रशेखर, मधु लिमये, जॉर्ज, रविंद्र वर्मा आदी च्या समन्वयाने जनता पार्टी ची निर्मिती १९७७ मध्ये आणीबाणी संपल्यावर केवळ एक महिन्यात झाली. त्याचे कारण ठेंगडीजींनी अखंड मेहनत घेऊन घटना लिहून सहमती घेवून पार्टीचे नांव नक्की करुन घेऊन जनता पक्षाच्या १९७७ च्या अभूतपूर्व विजयानंतर, तत्काळ, ठेंगडीजी राजकारणापासून अलिप्त झाले. भुमिगत लढा व जनता पक्षाची निर्मिती हा आपद्धर्म होता. कारण लोकशाहीची पुनःस्थापना करायची होती व त्यासाठी काँग्रेसी ठोकशाही पराभूत व्हायला हवी होती.

आपल्या बहद् संपर्कामधुन त्यांनी स्व. बाबू जगजीवनराम यांना ही आपलेसे केलेले होते. दमनकारी सरकारला सोडून ते जनता पक्षांत सामील झाले. त्यामागे कोण होते हे सर्व विदित आहे. या सर्वांनी एकमुखाने मागणी केली ती स्व. श्रध्देय दत्तोपंत ठेंगडी यांना भारताचे श्रममंत्री बनविण्याची.

परंतु स्व. ठेंगडी यांनी विनम्रपणे नकार कळविला. तत्कालीन प्रधानमंत्री स्व मोरारजी भाई यांना त्यांनी लिहीलेले पत्र त्या इतिहासाची साक्ष देते.

श्रमिकांची सुरक्षा करणारा निष्पक्ष कोणीतरी उभा रहायला हवा. जॉर्ज पण मंत्री बनले आहेत म्हणून त्यासाठी मी व भा.म.संघ आम्ही उभे आहोत. राजकारण हा आमचा प्रांत नाही. आणीबाणी दूर व्हावी व लोकशाही पुन्हा स्थापित व्हावी म्हणून आम्ही सर्व राष्ट्रशक्ति बनून काम केले आहे. आता तुमच्या सरकारला शुभेच्छा देऊन आम्ही आमच्या कामाकडे आहोत. असा त्या पत्राचा अर्थ होता.

गोरगरिब व कष्टकरी यांच्यामध्ये राहून त्यांच्या समस्या सोडवून कष्ट झाले तर ते कार्यकर्त्यांना होऊ दे पण गरीब सुखी व्हावा. अशी भा.म.संघाची

विचारांची बैठक आहे. पण ती आपल्या जीवनाच्या उदाहरणातून स्व. श्रध्देय ठेंगडीजींनी सिध्द करुन दाखविली.

**बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले** हे संत वचन सिध्द करणारे श्रद्धेय दत्तोपंत म्हणूनच सर्व श्रमिकांचे वंदनीय ठरले.

## ❋ त्रिपक्ष वार्ता सुत्राचे प्रणेता :

आंतरराष्ट्रीय श्रम संस्था आय एल ओ ने १९७७ सालच्या जिनीव्हा विश्व परिषदेमध्ये कायदा (convention) १४४ संमत केले. भारत या विश्वसंस्थेचा संस्थापक सदस्य आहे. भारत सरकारचे नव्याने बनलेले श्रममंत्री श्री रविंद्र वर्मा (जनता पक्ष) यांनी सदर वैश्विक कायद्यास मंजुरी दिली. कारण जिनीव्हा येथे त्यांचे मार्गदर्शक या नात्याने स्व. ठेंगडी गेलेले होते.

सरकारने श्रमिकांच्या अधिकारावर एकतर्फी आक्रमण करु नये, तर सरकार -मालक - श्रमिक अशा त्रिपक्षाच्या मदतीने श्रम कायदे बदलणे, नवे बनविणे इ. कामे करावीत असा **कायदा १४४** चा गाभा आहे.

नंतर आलेल्या जागतिकीकरणाच्या तडाख्यामधुन श्रमिकांची सुरक्षा करण्याचे एकमेव साधन भारतीय श्रमिकांच्या हाती उपलब्ध राहिले ते कायदा १४४ चे. आज ही सर्व श्रम संघटना त्रिपक्ष वार्ता व्हावी म्हणून मागणी करीत राहतात. पण या अधिकाराचे जनक स्व. ठेंगडी होते याची आठवण पुसट झाली आहे.

इंग्रजांच्या राजवटीत ३२ कायदे, जनता पार्टीचा एक कायदा, एन डी ए चे अटल सरकारचे ३ व मोदी सरकारचे दोन असे एकून ३८ कायदे भारताने स्वीकृत केले. अन्य ९, वैश्विक कायदे (ILO convention) कॉंग्रेसी साठ वर्षाच्या राजवटीत भारताने मान्य केले आहे. जगभराच्या १८० विश्व कायद्यापैकी भारताने केवळ ४७ कायद्यांची (ILO convention) स्वीकृती केली आहे.

या घोर श्रमविरोधी धोरणांच्या पृष्ठभुमीवर कायदा १४४ श्रमिकांना सुरक्षित ठेवणारी, एकमेव संजीवनी ठरली आहे.

## ❋ विभिन्न सामाजिक संस्थांची निर्मिती :

या देशांत एकाच सामाजिक कार्यकर्त्याचे अनेक देशव्यापी जनसंघटना निर्माण केल्या व वाढवून देशांत सर्वोच्च स्थानी पोहोचविल्या असे उदाहरण

केवळ एकच व ते म्हणजे स्व श्रध्देय दत्तोपंत ठेंगडी. असा प्रयत्न देशाच्या ज्ञात इतिहासांत दुसरा नाही. सरकारच्या आशिर्वादाने, आधिकाराच्या जोरावर, एकाधिकार पध्दतीने चीन मध्ये पीपल्स पार्टी ऑफ चायना ने असे संघटनांचे जाळे उभे केले आहे.

पण ठेंगडींचे काम हे सर्व गैर सरकारी व स्वेच्छा आधारित असल्याने जगाच्या ज्ञात इतिहासांत धांडोळा घेतला तरी असा व्यक्ती सापडणार नाही हा संशोधनाचा विषय आहे.

### ❋ भारतीय किसान संघाची निर्मिती :

भारताचा श्रमिक जसा संघटित होऊन उभा राहिला आहे. तसा देशाच्या हितांना जपणारा शेतकऱ्यांचा महासंघ देशभर झाला पाहिजे त्या शिवाय समाजाच्या अडचणी दूर होणार नाहीत कारण अर्ध्यांहून अधिक जनता शेतीवर अवलंबून आहे. याची प्रदीर्घ चिंता व चिंतन श्रद्धेय ठेंगडीजींनी केलेले होते. केवळ राजकारण साधण्यासाठी नेते शेतकऱ्यांना वेठीला धरतात हे सारा देश पाहत होता. राजकारण, सौदेबाजी व पुढारपणासाठी शेतकरी संघटना नकोत. शेतकऱ्यांनी चालविलेला व त्यांचे हित पाहणारा भारतीय किसान संघ याच विचारातुन ठेंगडींनी दि. ४ मार्च १९७९ ला निर्माण केला. जशा प्रकारे भारतीय मजदूर संघ वाढत वाढत देशांत पहिल्या क्रमांकावर गेला तसाच भारतीय किसान संघ सुध्दा आता देशंतील सर्वात बलवान बनलेला आहे. पुढारी, राजकारणी व सौदेबाजी सारे संपल्याने किसान क्षेत्रात आता फक्त भारतीय किसान संघ विद्यमान आहे.

### ❋ स्वदेशी जागरण मंचाची स्थापना :

१९९१ साली केंद्रात बनलेल्या नरसिंहराव सरकार ने नेहरु धोरणांना संपवले व नवीन आर्थिक निती आणली. जागतिकीकरण आले. त्यापूर्वीच कै राजीव गांधी सरकारच्या आधीपासुन विदेशी आर्थिक आक्रमणाची चाहूल ठेंगडींना लागली.

१९८४ च्या हैदराबादमध्ये झालेल्या भा.म.संघाच्या त्रैवार्षिक अधिवेशनात त्यांनी आपल्याला आर्थिक आक्रमणाविरुध्द स्वातंत्र्यलढा लढावा लागेल हे जाहीरपणे सांगितले. या दशकाच्या शेवटी व १९९१ साली झालेल्या आर्थिक

क्षेत्रातील घडामोडी सर्व सुबुध्द व देशभक्त जनतेला अस्वस्थ करणाऱ्याच होत्या. त्या आव्हानाचे गंभीर स्वरुप ध्यानात घेवून केवळ श्रम संघटनांच्या भरवशावर त्याला तोंड देणे शक्य नसल्याचे लक्षात घेवून सर्व जनसंघटनांनी व्यापक एकजुटीने त्याचा सामना करण्याशिवाय पर्याय नाही व म्हणून स्वदेशी जागरण मंचाची त्यांनी स्थापना केली. अन्यायकारक एकतर्फी अटी लादणारे व्यापारी करार करण्याची सक्ती, देशांतर्गत आर्थिक धोरणे बदलण्याचा दबाव, या विरोधात जनतेची एकजूट हाच प्रभावी उपाय होऊ शकतो व त्याद्वारेच देशाचे आर्थिक हित व राजकीय हित सुरक्षित राखता येईल हे त्यांनी दाखवून दिले. स्वदेशी जागरण मंचामुळे डब्ल्यु टी ओ च्या परिषदा व त्यातील आंतरराष्ट्रीय दबावनितीच्या राजकारणाची बरीच चर्चा देशभर झाली व त्यामुळे झालेल्या जागृतीमुळे भारत देश जागतिक आर्थिक शक्तींच्या हातचे बाहुले बनणार नाही असा विश्वास त्यातून निर्माण झाला.

### ❇ यापुढे ही भा. म. संघ क्र. १ वर राहील :

२००२ च्या आधारावर सदस्यता सत्यापनाचे काम सुरू होते. त्याचे वृत्त त्यांनी घेतले होते. त्यापृष्ठभूमीवर त्यांनी कार्यसमितीच्या देशभरच्या प्रतिनिधींचे केलेल्या चांगल्या कामांचे कौतुक केले.

मला खात्री आहे की, या सत्यापनानेतर भा. म. संघ देशात पुन्हा प्रथम क्रमांकाची केंद्रीय श्रम संघटना बनून स्थापित होईल. पण **त्यामुळे नेतृत्वामध्ये श्रेय लाटण्याची मानसिकता बनू नये याची चिंता करा.**

यासाठी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत झालेल्या प्रश्नोत्तराचा दाखलाही त्यावेळी दिला.

### ❇ एका नव्या शिखराचे दर्शन :

भा. म. संघ सर्वोच्च बनून गेली काही दशके काम करतो आहे. तशाच पद्धतीने या सर्वोच्च शिखरावर राहून श्रमिकांची सेवा करण्यासाठी रात्रंदिवस सर्व कार्यकर्ते झटून काम करतील याबद्दल माझ्या मनात पूर्ण विश्वास आहे, असे सांगून त्यांनी केंद्रीय कार्यकारीणीस म्हटले की, या स्थानापेक्षा वरचे एक शिखर मी पाहतो आहे. जेथे मात्र भारतीय मजदूर

संघ सोडून भारताच्या श्रमक्षेत्रात अन्य कोणीही असणार नाही. केवळ आणि फक्त भा. म. संघच असेल.

त्यांनी पुढे म्हटले की, ज्या पद्धतीने सामूहिकता पारिवारीकता आदि गुण वैशिष्ट्यांना घेऊन आपण आहोत, त्याविशेषता न सोडता सर्व कार्यकर्ते रोज १० ते १५ तास हे काम करत राहीले तर काही वर्षात भा. म. संघ त्या नव्या उंचीवर शिखरस्थ झालेला दिसेल.

भा. म. संघाचे काम करणाऱ्या सर्व नव्या, जुन्या कार्यकर्त्यांना मिळालेली ही दृष्टी पूर्णपणे नवी होती. अशा पद्धतीची परिस्थिती भविष्यात निर्माण करता येईल याची शक्यता, संभावना व ती स्थिती निर्माण करण्यासाठी चालावयाचा रस्ता या सर्वांचेच संपृक्त मार्गदर्शन स्व. श्रद्धेय ठेंगडीजी यांनी केले.

त्यांच्या शेवटच्या काही वर्षामध्ये त्यांचे वास्तव्य पुण्यात होते. एकदा ते म्हणाले, सर्व जगाला असे वाटते की, ठेंगडींना झोपेची गरज नसते. पण कामाच्या रेटयामुळे झोप दुर्मिळ झाली होती. अशा कामाच्या दबावामुळे त्यांच्या तब्बेतीची आयुष्यभर खुपच हेळसांड झाली.

उभ्या केलेल्या संस्था छान बाळसे धरुन उभ्या झाल्याने ते कृतकृत्य होते. अंतिम दशकात त्यांचे लक्ष स्थायी मार्गदर्शनाकडे वळले. आपल्या मागे कार्यकर्त्यांनी वाटचाल करताना कशी मनोभुमिका ठेवावी? वागणुक कशी असावी यासाठी त्यांनी अधिष्ठान-पध्दती-व्यवहार यांच्या त्रिसुत्री चे समग्र प्रतिपादन करणारा दस्तावेज तयार केला, वर्षानुवर्षे त्या आधारे आपल्या मार्गावरुन स्खलन येवू न देता मार्गक्रमाण करतील इतके आशयपूर्ण मार्गदर्शन कार्यकर्ता पुस्तकाद्वारे त्यांनी प्रस्तुत केले.

शेवटी आयुष्याची दोन वर्षे डॉ आंबेडकरांवरील ग्रंथ तयार करण्यात त्यांनी वेचली, ती एक ऐतिहासीक साहित्य निर्मिती होती.

रात्रंदिवस व्यस्त जीवन व्यतीत केलेल्या ठेंगडीजींनी रात्रीचा झोपेचा व्यक्तिगत जीवनातला वेळ कापून, त्यामध्ये अध्ययन केले. जगातल्या अनेकविध विषयांमधले अचूक संदर्भ त्यांच्या नित्य बोलण्यातून येत

असत. अत्यंत तुटपुंज्या वेळात त्यांनी उभी केलेली ग्रंथ संपदा थक्क करणारी आहे. ३५ हिंदी पुस्तके, पुस्तिका, १० इंग्रजी पुस्तके, ५ मराठी पुस्तके अशी त्यांनी ग्रंथ संपदा आहे. चिंतन पाथेय, वत्कृत्वाची पूर्वतयारी, ऐरणीवरचे धाव, ही त्याची मराठी पुस्तके आहेत.

त्यांच्या शष्ठ्यब्दी पूर्तीच्या वेळी (१९८०) लिहीलेल्या एका कौतुक आलेखात **डॉ सुब्रह्मण्यम स्वामी लिहीतात, "He was thinker in hurry"** घाईगर्दीच्या आयुष्याचे धनी असलेले ते चिंतक होते. आरामखुर्चीमध्ये बसुन केवळ चिंतन करणाऱ्यांपैकी ते नव्हते. पण त्यामुळे भारतीय समाज त्यांच्या क्षमतानुरुप चिंतनाला मुकला आहे.

परंतु त्या नंतरच्या २५ वर्षात त्यांनी ही कमतरता भरुन काढण्याचा यथाशक्य प्रयास केला आहे.

कार्यकर्ता पुस्तक हे त्याचेच एक उदाहरण होय.

## ❈ अंतीम वर्ष :

त्यांचे हे मार्गदर्शन भा. म. संघासाठी शेवटचे प्रकट उद्‌बोधन होते. कदाचित त्यांना जीवनाच्या अंताची चाहूल लागली असावी. त्याबेताने आगामी दोन दशके वाटचाल करण्याची प्रेरणाच त्यांच्या या ऐतिहासिक मार्गदर्शनामधून त्यांनी देशभरच्या लाखो सदस्यांना दिली. कार्यकर्त्यांनी आपला विचार-आचार व व्यवहार कसा ठेऊन या कामात पुढे निघावे? याचे समग्र मार्गदर्शन त्यांनी आपल्या कार्यकर्ता पुस्तकाद्वारे दिले आहे.

जे जे सांगणे जरूरी होते, ते ते सांगून ठेवले आहे, आता ते जाणून घेऊन जशी इच्छा होईल तसे कर, असे श्रीमद्‌भगवत गीतेच्या उपदेशामध्ये श्री भगवान अर्जुनास उद्देशून सांगतात,तशाच पद्धतीचे मार्गदर्शन स्व. श्र. ठेंगडीजींनी भा. म. संघास दिले. प. पू. श्री. गुरूजींच्या परीक्षेत अव्वल ठरेल असे जीवन ते स्वत: जगले.

मानवी समाज जीवनाची वैश्विक रचना, माणसाला पंगू व खुजा बनविणारी नसावी, सर्व वैश्विक रचनेच्या विचारांच्या केंद्रात मानवता वसावी अशा अर्थाची स्व. ठेंगडी यांची सुप्रसिद्ध कविता आहे. संत

मागणी ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदान हेच आमचे समग्र मागणीपत्र आहे असे ते म्हणत असत.

चौहाना बूरा नही, अगर चौहत छोटी न हो या कवितेच्या शेवटी ते म्हणतात की, अशा विश्व कल्याणाची इच्छा पूर्ण होईपर्यंत मला मोक्ष नको मी जन्मोजन्मी चालत राहील.

जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधू वोळखावा, देव तेथेचि जाणावा ।

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या या अभंगाच्या आशयाला धरून जेथे जेथे भा. म. संघाचे काम चालत आहे, त्या प्रत्येक प्रसंगी स्व. श्री. ठेंगडी सूक्ष्म रूपाने उपस्थित राहून यशस्वीतेचा आशिर्वाद देतात अशी कार्यकर्त्यांची श्रद्धा आहे.

जन्म मृत्यू सर्व विधीचे विधान असते. जो जन्माला आला, त्याला मृत्यू अटळ आहे. कालचक्र आपल्या गतीने फिरत राहते. जीव जन्म घेतो, जीव जगतो आणि परलोकी गमन करतो परंतु काही विशिष्ठ महापुरूष ईश्वरीयोजनेमधून जन्म घेतात. ईश्वरी योजनेचे कार्य सिद्ध करून देवलोकी महाप्रयाण करतात.

वयाच्या चौथ्या वर्षापर्यंत लहानगा दत्तु बोलत नसे. माता पिता चिंतीत झाले व दत्त महाराजांच्या अनुग्रहासाठी लहान बालकाला गाणगापूरी दत्त दर्शनाला घेऊन गेले. पूजा अर्चना संपताच बाल बोलू लागला असे त्यांचे कुटुंबिय सांगत. त्यांनतर अव्याहत ऐंशी वर्षे ते विविध मार्गांनी व्यक्त होत राहिले. सारे तल्लीनतेने ऐकत राहिले.

बडे शौक से सुन रहा था, जमाना
तुम हो सो गये दास्ताँ कहते कहते

या उक्तिनुसार साऱ्या देशाला निशब्द करून दिनांक १४.१०.२००४ रोजी हा महावक्ता निशब्द झाला.

१९९९ च्या एप्रिलमध्ये अतिगंभीर अवस्थेमध्ये त्यांच्यावर दिनदयाल इस्पितळात धन्वंतरी डॉ. भीमाशंकर मूळ्ये यांनी शस्त्रक्रिया करून त्यांचा जीव वाचवला होता.

माझी भविष्यवाणी कधीच खोटी ठरत नाही. त्यांचा मृत्यू याचवेळी लिहिलेला आहे. तो टाळणारा धन्वंतरी कोण आहे? असे विचारत त्यावेळी केरळ वरून स्व. ठेंगडींचे स्नेही पुण्यात येऊन डॉ. मुळ्ये यांना अभिवादन करून गेले. ही घटना फार थोड्या जणांना विदित आहे.

मृत्यू टळला कारण पुढे डॉ. आंबेडकर यांचा जीवनग्रंथ पूर्ण करायचे शेवटचे काम हातून व्हायचे होते. त्यांनतर मधूनमधून तब्येतीचे बिघाड सहन करीत स्व. बापू केंदूरकरांचे सहाय्याने ग्रंथलेखन सुरू ठेवले. जुलै २००४ ला हा ग्रंथ पूर्ण झाला.

प. पू. सरसंघचालकांनी दिलेली जबाबदारी पार पाडल्याचा त्यांचा आनंद चेहऱ्यावर स्पष्ट झळकत होता. काम पूर्ण झाले आता थोड्यावेळासाठी दिल्लीत येऊन जाईन असे बोलणेही त्यांनी केले होते.

सप्टेंबर २००४ मध्ये त्यांची एक छोटी शस्त्रक्रिया पार पडली. शेवटच्या पाच वर्षांच्या त्यांच्या पुण्याच्या मुक्कामात पाषाणला श्री जोशी परिवाराचे सौजन्यशील अतिथ्य व स्नेह यामुळे त्यांचा तेथील निवास सुखकारक झाला होता. पुण्याचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. एस. एन. देशपांडे जणू त्यांचे काळजीवाहक पालक बनलेले होते.

स्व. दत्तोपंतांच्या नाजूक शारिरिक स्थितीतही थोरामोठ्यांच्या गाठीभेटी सुरूच होत्या. त्यांचे आंबेडकरांच्या ग्रंथ संपादनाचे कामही सुरू होते.

श्री. महामुनी यांनी त्यांचे तेथील राहते घर स्व. ठेंगडींच्या मुक्कामासाठी सर्वकाळ उपलब्ध करून दिले होते. त्यांना तेलमालिश करून घेणे आवडत असे त्यामुळे त्यांना खूप आराम मिळते असे. महाराष्ट्र प्रदेश भा.म.संघाचे विद्यमान अध्यक्ष मा. श्री अण्णासाहेब धुमाळ त्यांना मालिश करुन देण्यासाठी नियमित जात असत. स्व ठेंगडी आता जोशी परिवारामधील एक घटक बनलेले होते. सौ वहिनी (जोशी) त्यांची सेवा आईच्या मायेने करीत होत्या.

शस्त्रक्रियेनंतर स्व. ठेंगडीच्या तब्येतीत पुन्हा पुर्ववत पदावर येताना सर्व पहात होते.

२००५ या वर्षी भा.म.संघाची स्वर्णजयंती येणार होती. सुरतच्या केन्द्रीय कार्यसमितीमध्ये, अधिवेशन दिल्लीमध्ये करायचे, कारण तेथूनच १९५५ ला सुरवात झाली होती. याची साधक बाधक चर्चा झाली.

### ❈ अखेरचे वर्ष २००४ :

वय ८४ होवूनही त्यांचे प्रवास सुरुच होते. सोबत कोणी कार्यकर्ता घ्यावा असे त्यांचे भाचे श्री देशपांडे (मर्डीकर) यांनी त्यांच्या नागपूर भेटीमध्ये सुचविले. त्यावर स्व ठेंगडीजी त्यांना म्हणाले, त्याची गरज नाही, माझा मृत्यु प्रवासात येणार नाही हे मी जाणून घेतले आहे.

त्यांनी आपला आहार ही घटविला होता. विदर्भाच्या एका प्रवासामध्ये वर्ध्याजवळ २००४ च्या सुरवातीला ते काही काळ बेशुद्ध झाल्याने इस्पितळांत भरती झाले होते.

भा.म.संघाचे त्रैवार्षिक अधिवेशन फेब्रुवारी २००२ मध्ये तिरूवनंतपुरम् येथे झाले. त्यावेळी तेथे ही ते कमालीचे अशक्त झालेले होते. अधिवेशनाच्या खुल्या सत्राच्या भाषणासाठी सायंकाळी इस्पितळातून मंचावर व तेथून परत इस्पितळाकडे न्यावे लागले होते.

पण त्यामधुन त्यांनी पुन्हा उभरी धरली. डॉ आंबेडकरांवरील त्यांचा ग्रंथ अजुन त्यांच्या हातून व्हायचा होता. कदाचित तशी परमेश्वरी योजना असावी.

### ❈ एप्रिल २००४ सुरत बैठक
### शेवटचे प्रकट मार्गदर्शन :

५ एप्रिल २००४ रोजी सुरत येथे भा.म.संघाची केन्द्रीय कार्यसमितीची बैठक सुरु झाली. बैठकपूर्व संचालन समितीची बैठक व त्यानंतर दोन दिवस समन्वयाची बैठक अशा सर्व बैठकांना ठेंगडीजी उपस्थित होते.

नेहमीच्या कुर्ता, धोतर, गमछा अशा साध्या वेशात ते सर्व काळ उपस्थित राहिले. बैठकीच्या शेवटी त्यांनी सर्व देशभरच्या प्रमुख कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. ते त्यांचे शेवटचे प्रकट मार्गदर्शन राष्ट्रीय स्तरावर झाले.

नंतर अवघ्या सहा महिन्यातच या ऋषितुल्य मार्गदर्शकाचे महानिर्वाण झाले. त्यांच्या चिंतनातून उपजलेल्या दिशा निर्देशाचे दोन महत्वाचे मुद्दे बनले. ज्यामधून त्यांनी भविष्याचा वेध घेतला होता.

### ❋ शेवटचा बेत :

ऑक्टोंबर २००४ मध्ये थोडे दिवस दिल्लीस जाऊन येणार असे त्यंनी तेथे कळविले होते. त्या बेताने त्यांची तब्येत ही सुधारत होती.

भा.म.संघाचा इतिहास विविध घटना, प्रगती, विकास व व्याप्ती, यांचे विवरणातून कथन करावा, म्हणजे त्यांचे तोंडून त्यांच्या आवाजात दृकशाव्य इतिहास येणाऱ्या पिढयांसाठी उपलब्ध होईल. अशी चर्चा झाल्यामुळे ते एक काम डिसेंबर २००४ मध्ये करायचा बेत नक्की झाला.

भा.म.संघाच्या देशभराच्या कामामध्ये असे दस्तावेज क्वचितच मिळतात, जे या देशव्यापी कामाच्या वाढीचाच यथार्थ मागोवा सांगतील. त्यामुळे अभिलेख तयार करणार कसा? म्हणून अशी चर्चा झाली की, खुद्द संस्थापकांनी त्यांचे व्हिडोओ ग्राफ बनवावेत.

चाचणीचा एक तासांचा भाग बनवून पाहिला. तो ठीक आल्यामुळे विविध विषयांचे २५ तासांचे रेकॉर्डींग करायचे ठरले. २००६ मध्ये प.पू. श्री गुरुजी जन्मशती येणार होती. म्हणून त्यांचे काही भाग बनवावे असे पण ठरले.

दुसरा एक विषय चर्चेत आला तो म्हणजे पुस्तिका लिहीण्याचा, भा.म.संघाच्या २५ वर्षे झाली. त्यावेळी स्व. ठेंगडीजींनी भा.म.संघ के बढते चरण ही पुस्तिका लिहीली होती.

तशीच एक पुस्तिका काढावी असे चर्चेने ठरले ते उत्तरले, मी दिल्लीस जाऊन येतो, अधिवेशन फेब्रुवारी २००५ ला आहे. तोवर सगळी कामे यथास्थित करु या.

या सर्व चर्चा आदल्या दिवशी सायंकाळी म्हणजे १३ ऑक्टोंबर २००४ ला झालेल्या त्यांच्या जीवनकाळात त्यांनी भा.म.संघाच्या कामाची

पायाभरणी मजबूत केली होती. कशी वाटचाल करायची याचा वस्तुपाठ त्यांनी दिलेला होता. त्यामुळे आगामी पन्नास वर्षे नवे व वेगळे मार्गदर्शन लागणार नाही याची त्यांना खात्री होती. सर्व देशभर च्या कार्यकर्त्यांवर त्यांचे छत्र होते. त्यामुळे कार्यकर्तेदेखील बिनधास्त होऊन कामात होते.

अशामध्ये अचानक अघटीत काही होईल अशी शंका ही कोणाच्या मनात नव्हती. परंतु ईश्वरेच्छा बलियसी। १४ ऑक्टोबर रोजी स्नानासाठी गेलेल्या ठेंगडीजींनी स्नान संपल्यावर तेथेच पद्मासन घालून समाधी लावली. त्यांना डॉ मुळये यांचेकडे श्री एस एन देशपांडे घेऊन गेले. पण उपचारांचा काही उपयोग झाला नाही.

त्यांचा नित्य चरैवेती मंत्रजाप करणारा पवित्र आत्मा कर्दळीवनी महागमन करता झाला. त्यांच्या महाप्रयाणाची अधिकृत घोषणा डॉक्टरांनी केली.

दुसरे दिवशी १५ ऑक्टोंबर २००४ ला सायंकाळी विधीपूर्वक मंत्राग्नी देण्यासाठी त्याचे स्नेही व भारताचे पूर्व प्रधानमंत्री स्व. अटलबिहारी वाजपेयी उपस्थित होते. त्यावेळचे रा.स्व. संघाचे सरकार्यवाह मा. मोहनराव भागवत, भा.म.संघाचे तत्कालीन अध्यक्ष मा. हशुभाई दवे, संस्थापक सदस्य मा. स्व रमणभाई शहा आदी मान्यवर उपस्थित होते. स्वतः सरसंघचालक स्व. सुदर्शनजींचे प्रमुख संबोधन झाले.

त्यांच्या महानिर्वाणाने श्रम क्षेत्रामधल्या नव विचारांचा सृजनकर्ता ऐतिहासीक समाज परिवर्तन घडवून काळाच्या पडद्याआड गेला.

**❈ अढळपद :**

स्व. ठेंगडी यांनी त्यांच्या आयुष्यात ३५ देशांचा प्रवास केला. त्यांची १९६८ ची रशिया भेट संस्मरणीय ठरली. तत्काळीन उपराष्ट्रपति वराहगिरी वेंकट गिरी त्यांना त्यांच्या इंटक मधील कामामुळे ओळखत होत. राज्यसभेमधील त्यांच्या प्रवेशानंर दोघांचा स्नेह जुळून आला.

त्याकाळी रशियाचा दबदबा होता. वैश्विक शीत युध्द चरसीमेवर होतं. तेथे भारतीय संसद सदस्यांचे शिष्ठ मंडळ जायचे. विख्यात वामपंथी

नेता हिरेन (दादा) मुकर्जी आणि तत्सम अनेक संसद यावेळी जायचे होते. डॉ गिरींच्या आग्रहावरुन स्व. ठेंगडींजी चे नामांकन करण्यात आले.

हिरेन मुकर्जी वामपंथी होते. पण वेदविद्या व्यासंग व हिंदू धर्मशास्त्रंचे जाणकार होते. पण खुलेपणाने हिंदू म्हणवून घेणे, त्यांच्या पुरोगामी डाव्या विचारांच्या विपरीत होते. मॉस्को मधल्या एका विश्वविद्यालयात त्यांचे सायंकाळी धर्म व ईश्वर या विषयावर आक्रमक प्रतिपादन झाले. मार्क्सवादी तर्क मिमांसा देवून ईश्वरभाव कसे थोतांड आहे, हे त्यांनी जोर देवून मांडले.

पण रात्री त्यांचे पुस्तक परत देण्यासाठी हॉटेलच्या त्यांच्या खोलीकडे स्व. ठेंगडी पोचले, तेव्हा संस्कृत पठणाचा आवाज आतुन येत होता. दरवाजा बंद नव्हता. आदि शंकराचार्यांचे निर्वाण षटकम् स्त्रोत्र चिदानंदरुपम् शिवोहम् ते म्हणत होते. ठेंगडींना पाहून ते चपापले. मी देव मानत नाही म्हणाले. पण त्या बेताने दोघांचा संवाद झाला व तो पुढे सुरु राहिला.

परतीच्या प्रवासात ते दोघे वेगवेगळे जायचे होते. स्व. ठेंगडी ईजीप्तकडे गेले होते. स्व दत्तोपंत ठेंगडींना निरोप घेताना ते म्हणाले, **या विश्वात तुम्ही तुमचे अढळ स्थान निश्चित प्राप्त केले आहे,** मला ते सापडलेले नाही.

## ❋ मृत्यु लेख व श्रध्दांजली :

देशभरातल्या लाखो शोकविव्हल कार्यकर्त्यांनी हजारो स्थानी श्रध्दांजली सभा केल्या. पुण्याच्या वैकुंठ स्मशान भुमीवर दि. १५ ऑक्टोंबर २००४ च्या सायंकाळी विराट शोकसभा झाली. स्व. अटलबिहारी वाजपेयी, स्व मा. सुदर्शनजी, स्व अशोक सिंघलजी, सभेच्या मंच्यावर होते. दिवसभरात मा. अडवाणीजी, गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. नरेंद्र मोदीजी, (आजचे पंतप्रधान) स्व. गोपिनाथ मुंडेजी आदी समवेत हजारो स्वयंसेवक, भा.म.संघाचे कार्यकर्ते पुष्पांजी वाहून गेले.

अनेक मान्यवरांनी लेख लिहून, संस्मरणे लिहून आपले मन मोकळे केले. दिल्ली मध्ये ३१ ऑक्टोंबर २००४ ला श्रध्दांजली सभा झाली.

देशामधल्या सर्व प्रमुख श्रमिक नेते, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते या सर्वांनी त्यांना श्रध्दांजली वाहिली.

१७ ऑक्टोंबरला पांच अस्थिकलश बनले. पुण्याजवळ इंद्रायणी संगमात, हरिद्वार, प्रयाग, नाशिक व नागपूर अशा ठिकाणी अस्थि जलप्रवाहित करण्यात आल्या.

श्री पी परमेशवरन्, पू. प्रमिलाताई मेढे, डॉ सुब्रह्मण्यम् स्वामी, एस गुरुमुर्ती, के आर मलकानी, मा. वेणुगोपलजी आदी दिग्गजांनी लेख लिहीले.

## ❖ व्यक्तिच्या मोठेपणाचा मापदंड :

स्व. ठेंगडीचे चरित्र अवलोकन केले की, ते मोठे होते. चिंतक होते, ऋषितुल्य जीवन जगले. असामान्य प्रतिभेचे धनी होते. अजोड संघटक होते. त्यांची कुशाग्र बुध्दी व आश्चर्य करावी अशी स्मरणशक्ति वगैरे वगैरे सर्व गुणवैशिष्ट्य समजून येतात.

पण एखादे व्यक्तित्व मोठे होते, म्हणजे किती मोठे होते. याची मोजपट्टी कोठे आहे? मोठेपण कसे मोजावे?

या विषयी त्यांनी स्वतःच, त्यांच्या पूर्वायुष्यातील घटना लिहून ठेवली आहे. त्यांचे सांसद स्नेही व डावे नेते श्री बालचंद्रन यांनी संसदभवनामधील एका अनौपचारिक वार्तालाप मध्ये आपल्या तरुण साथीदाराला म्हटले, सामाजिक कार्यात असलेल्या व्यक्तींचे मोठेपण हे त्याच्या कार्याने ठरते. त्या कामाची सावली भविष्यात किती दूरवर पोचली हे पाहून ठरवता येईल, की त्या व्यक्तीच्या जीवनकाळात तो किती उंच होता. कदाचित त्याच्या जीवनकाळामध्ये त्याचे व्यक्तित्व ठळकपणे समोर आले नसेल. हा संवाद त्यांच्या कार्यकर्ता पुस्तकांत नमूद आहे.

या कसोटीवर स्व.श्रध्देय दत्तोपंत ठेंगडी यांच्या व्यक्तीत्वाचे मूल्यांकन वेळोवेळी व दीर्घकाळपर्यंत होत राहील.

त्यांनी उभी केलेली सामाजिक कामे नित्य वर्धिष्णू आहेत. समाज परिवर्तनाची ऐतिहासीक कार्ये त्यांचे हातून सेवाभावाने होत

राहतील. जोपर्यंत त्यांच्या कामाच्या विकासाचे नवे धुमारे फुटत राहतील तोपर्यंत, कार्यकक्षा विस्तृत होऊन नवनवीन क्षेत्रे बनत राहतील तेव्हा, स्व.श्रध्देय ठेंगडी नित्य नव्या रुपांत, नव्या क्षितीजांवर दृश्यमान होतील, तेव्हा त्यांच्या व्यक्तित्वाचे, त्यांच्या कार्याचे पुर्नमुल्यांकन होतच राहील.

त्यांना पाहिलेले, त्यांचे जीवनकाळात कामामध्ये असलेले, त्यांच्या सभोवती काम केलेले व त्यांचे सहयोगी अशा सर्वांसाठी ते प्रेरणास्थान होते व आजही आहेत.

त्याच सोबत, त्यांना न पाहिलेले, नवे निष्ठावंत असे कार्यकर्ते ही त्यांच्या छायाचित्रांमधून त्यांना जाणून घेऊन, त्यांच्या भाषणांच्या ध्वनिफिती ऐकून, त्यांचे साहित्य वाचून इ. अशा विविध मार्गांनी प्रेरणा घेऊन पुढे येत आहेत. त्यांचेमुळे भा.म.संघ नित्य पुढेच निघाला आहे. ही प्रक्रिया निरंतर सुरु रहावी यासाठी संघटनेत नव्या कार्यकर्त्यांना स्थान देण्याची व्यवस्था संघटनेत आहे.

आपले पददायीत्व सोडून काम करणारे जुने जाणते कार्यकर्ते आधार देण्यासाठी कामाचे संरक्षक म्हणून उभे राहण्याची प्रक्रिया सुरु आहे.

येणारी अनेक दशके वारंवार मुल्यांकन होत राहील, म्हणूनच स्व.श्र.ठेंगडी यांच्या व्यक्तित्वाची उंची मोजणे आज तरी अशक्य आहे. भारताच्या श्रम इतिहासांत त्यांच्या उंचीचा कोणी आज तरी नजरेत येत नाही.

वर्धिष्णुर्विश्ववंदिता ही श्रमिक क्षेत्रासाठीची बिरुदावली त्यांना सर्वथैव उचित ठरते आहे.

## ❈ अनुकरण ही आदरांजली :

स्व. ठेंगडींचा फोटो पाहून नमस्कार करुन व फुले वाहून त्यांना देवत्व देणे यासाठी २०१९ वर्षात त्यांची जन्मशताब्दी साजरी होत नसून त्यांच्या व्यक्तीत्वाकडून प्रेरणा घेऊन त्याप्रमाणे स्वतःला अनुकरणाने

मध्यावयचे आहे. याची आठवण देण्यासाठी जन्मशताब्दी च्या वर्षाचे कार्यक्रम आहेत.

स्व. ठेंगडीच्या सर्व गुणांना आत्मसात करणे शक्य नसेल, पण त्यांच्या शतांशा चे तेज तरी आत्मसात व्हावे यासाठी त्यांचे व त्यांच्या कार्याचे नित्य स्मरण करणे व त्यांनी घालून दिलेल्या मार्गाने भारत-मातेची सेवा करणे ही त्यांना खरी आदरांजली होऊ शकते.

## ❋ स्व. ठेंगडीजी व महाराष्ट्र :

भारतीय श्रम चळवळीचे जनक स्व. नारायण मेघाजी लोखंडे यांची कर्मभुमि महाराष्ट्र असल्याने स्वाभाविकच महाराष्ट्र श्रमिक चळवळीमध्ये अग्रणी राहीला आहे. एके काळी मुंबईसह उर्वरित महाराष्ट्रावर डाव्या विचारांचे साम्राज्य होते. लाल निशाण पक्ष व शेतकरी कामगार पक्ष यांच्या ट्रेड युनियन्स होत्या व त्यांचा पसारा मोठा होता.

समाजवादी विचार सरणीचे सर्वश्री, एस एम जोशी, मधु लिमये, जॉर्ज फर्नांडिस, नानासाहेब गोरे, आर जे मेहता, एस आर कुलकर्णी यांच्या रुपाने व त्यांच्या संघटनांमुळे त्यांचेही प्राबल्य महाराष्ट्रांत होते.

डाव्या चळवळीमध्ये डांगे, मिरजकर, कोल्हटकर यांच्या रुपाने सी पी आय चे मोठे नेतृत्व महाराष्ट्रांत होते. केवळ परिदृश्य ध्यानी यावे म्हणून नावांचा उल्लेख अपरिहार्यपणे केलेला आहे. पुष्कळ मोठी नांवे जोडता येतील.

१९५५ ते १९६५ या दहा वर्षातील महाराष्ट्राची श्रमिक चळवळ जनतेला जाणवली ती प्रामुख्याने डाव्यांच्या मोर्चे, आंदोलने, संप यांचेमुळे. त्यानंतरच्या काळात झालेले रेल्वे संप १९७४ व गिरणी कामगार संप १९८२ ही आंदोलने नोंद घेण्यासारखी होती. कामगारांच्या मदतीने जॉर्ज फर्नांडिस विरुध्द स का पाटील, रोझा देशपांडे विरुध्द डॉ वसंतकुमार पंडित, या लोकसभेच्या लढती महाराष्ट्राच्या लक्षात राहिलेल्या आहेत. श्रमिक आधारावर डॉ श्री दत्ता सामंत यांच्यासारखे नेतृत्वाचा उदय व अस्त सर्वांसमोर आहे. दादा रुपमय चटर्जी (पुणे) आप्पासाहेब भोसले

(पुणे), अण्णासाहेब पाटील (मुंबई) संग्राम पाटील (कोल्हापूर) दि बा पाटील (कोकण) ही काही नावे चळवळीमध्ये ठळकपणे नोंदलेली आहेत.

### ❋ डाव्या चळवळीची अवकळा :

आपसातील व्यक्तींचे विवाद, संघटनांची फाटाफुट, भ्रष्टाचार, दीर्घकालीन योजनांचा अभाव, नेतृत्व बदलाचा अभाव, शिवसेनेचा उदय, आणीबाणी, जागतिकीकरण, नव्या क्षेत्रांना स्पर्श करण्याची अकार्यक्षमता या व अशा अनेकविध कारणांनी महाराष्ट्राच्या श्रमिक आंदोलनाची दुर्दशा झाली आहे. डावे राजकारण मोडीत निघाल्याने डाव्या चळवळीमध्ये काम करण्याची प्रेरणा संपली आहे. देशभराची ही अशीच स्थिती आहे. कशासाठी काम करायचे? हे कार्यकर्त्यांना सांगता येत नाही. या अवस्थेत त्या कामाचा आत्मा हरवतो व शेष राहिलेले कलेवर असते. काळाच्या ओघांत ते संपून जाते. ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. देशाचा डावा विचार या प्रक्रियेतून जात आहे.

### ❋ भारतीय मजदूर संघ :

डावा विचार पूर्ण प्रभावी होता अशा वेळी १९५५ ला भा.म.संघाची स्थापना झाली. त्या स्थापनेच्या बैठकीत एकूण २८ कार्यकर्ते होते त्यापैकी महाराष्ट्राचे १० होते.

सर्वश्री रमणभाई शहा, बाळासाहेब कुलकर्णी, माधवराव पलांडे, भाऊराव बेलवलकर, कान्हेरे, सबनीस (सर्व मुंबई), नरसैय्या चिप्पा, दत्तात्रेय वैद्य, वसंतराव परचुरे, माधवराव बापट (सर्व पुणे) आज यांचे पेकी कोणीही हयात नाही. स्व ठेंगडी समवेत यांचेही सर्वांनी पुण्यस्मरण करायला हवे.

स्थापनेच्या बारा वर्षानंतर, म्हणजे १९६७ ला भा.म.संघाचे पहिले अधिवेशन दिल्लीला झाले. अ.भा. पदाधिकारी नऊ होते व अठरा सदस्य होते. त्यापैकी स्व. गजाननराव गोखले, उपाध्यक्ष मुंबई व स्व मनहरभाई मेहता, कोषाध्यक्ष, मुंबई हे दोन महाराष्ट्राचे कार्यकर्ते पदाधिकारी

होते. स्व. रमणभाई शहा(मुंबई), स्व. अमलदार सिंह रेल्वे (मुंबई) हे दोन कार्यकारिणी सदस्य होते.

महाराष्ट्रामध्ये काही काळ मुंबईमधुन केन्द्रीय कार्यालय चालत असे, हशीम बिल्डींग, फ्लोरा फौंटन, मुंबई येथे स्व मनहरभाई मेहता बसत असत. तेथे ठेंगडींच्या प्रवासांत छोटी बैठक होत असे. त्यापूर्वी गिरगांव मध्ये बैठका होत. परळमध्ये स्व रमणभाई शहा यांचे घरी बैठका होत. सर्वश्री गजाननराव गोखले, बाळासाहेब साठये, मनहरभाई मेहता, रमणभाई शहा हे या बैठकांमध्ये भेटत.

आणीबाणीनंतर जवळपास वीस वर्षे मुंबईमध्ये भेटीचे वेळी स्व ठेंगडीचा मुक्काम ॲड श्रीकांत धारप यांचे घरी होत असे.

पहिल्या बारा वर्षात भा.म.संघाचा कार्यालयीन व आर्थिक भार महाराष्ट्रावर येत असे. चिंतन लिखाण, दस्तावेज, निवेदने, पुस्तके, पुस्तीकांचे लिखाण सारे मुंबई मधुन होत असे.

पुढे जाऊन या पैकी स्व मनहरभाई मेहता, स्व. रमणभाई शहा, अखिल भारतीय अध्यक्ष बनले. स्व धारप महाराष्ट्राचे अनेक वर्षे कार्याध्यक्ष होते. स्व बाळासाहेब साठये यांनी देशभरच्या वीज उद्‌योगांच्या संघटना बांधल्या. ते अ.भा. संघटन मंत्री राहिले.

मुंबईचे २० ऑगस्ट १९६३ चे मुंबई बंद यशस्वी आंदोलन, १९७२ च्या तृतीय अ.भा.अधिवेशनांत असंघटीतांचा विराट सहभाग, १९७५ च्या आणीबाणीमध्ये बिडी, रस्ता, असंघटीत, श्रमिकांनी केलेले लढे, इ. मुळे टप्प्या टप्प्यानी भा.म.संघ महाराष्ट्रात प्रभावी होत गेला.

रेल्वेचे १९७४ चे संयुक्त आंदोलन, मुंबई म्युनिसिपल श्रमिकांचा १९७३ चा संयुक्त लढा, आयुर्विमा उद्‌योगांचा १९७३ चा संयुक्त लढा आदींमुळे महाराष्ट्राच्या सर्व स्तरावरील श्रमिकांना भा.म.संघ परिचित झाला.

वीज उद्‌योगांची जिंकलेली बोनस केस, लकडावाला समितीची निर्मिती, राष्ट्रपतींना सादर केलेला नॅशनल चार्टर या मधून भा.म.संघाची बौध्दीक संपदा श्रमिकांनी पाहिली.

महाराष्ट्राच्या वरील सर्व उपक्रम पराक्रमामुळे गेली २० वर्षे भा.म.संघ महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर सत्यापित झाला आहे.

स्व. नामेदवराव घाडगे (टेक्सटाईल), स्व. श्रीपाद देशपांडे (बँक), स्व. अच्युतराव देशपांडे (टेलिकॉम), स्व. श्रीधर लाटे (टेलिकॉम), स्व. रमेशजी सुर्वे (पोस्ट), स्व. शरद जोशी (आर एम एस), स्व. श्री. नावडे (संरक्षण) यांसारख्या प्रातांमधील कार्यकर्त्यांनी रात्रीचा दिवस करून स्व. ठेंगडींच्या मार्गदर्शनाखाली अ. भा. जबाबदाऱ्या पार पाडल्या व ते आज आपल्यामध्ये नाहीत.

सर्वश्री दत्ता रावदेव (रेल्वे), एस एन देशपांडे (वीज), बाळासाहेब फडणवीस (बँक), अनंतराव करंबेळकर (औद्यो) हे आजही महाराष्ट्राच्या वाटचालीचे साक्षीदार आहेत.

**भारत माता की जय**

□□□

# श्रध्देय दत्तोपंत ठेंगडीजींच्या जन्म शताब्दी निमित्त गीत

श्रम जगत में कर्म पथ पर
एक तू आधार है, एक तू आधार है ।। धृ।।

भरत भू पर दत्तमूर्ति, है खडी बनकर सहारा।
ज्ञानमय संपर्क पाकर, धन्य है जीवन हमारा ।।
है अटल विश्वास होंगे, स्वप्न सब साकार है ।।
स्वप्न सब साकार है ।। १ ।।

व्यास सा है ज्ञान तुझमें, कृष्ण का उपदेश है तू।
सृजनता मधु की है पाई, संघ का संदेश है तू ।।
तत्व के पूर्णांक में तू, मनुज का आकार है ।।
मनुज का आकार है ।। २ ।।

राष्ट्र हित कैसे जिये यह, मंत्र है तुमने सिखाया ।।
श्रमिक में विश्वास जागे, तंत्र है तुमने बताया ।।
मन मिले मन से सदा तो, ह्दय एकाकार है ।।
ह्दय एकाकार है ।। ३ ।।

यह न सोचे क्या मिलेगा, व्यर्थ में तन मन लगाकर ।
क्या दिया है, हम ये सोचे, इस धरा पर जन्म पाकर ।।
जन्म शति पर हो समर्पित, बस यही अधिकार है ।।
बस यही अधिकार है ।। ४ ।।

# स्व. श्रध्देय ठेंगडींचे बोल

* आपल्या महान राष्ट्राच्या आधारभूत पायाच्या दगडापैकी एकाचा अतिछोटा तुकडा बनुन राहीन.

* सर्व कामे केल्यावर, थोडे थांबा, वाट पहा, कारण गोमटी रसाळ फळे धैर्यपूर्वक केलेल्या कामाच्या शेवटी मिळतात.

* आदर्श श्रम संस्थेच्या अभावामुळे देशाचे व श्रमिकांची अपरिमित हानी झाली आहे. असली रुपामध्ये श्रम संघटना चालाव्या व त्यांचा हेतू श्रमिक कल्याण व देशहिताचा असायला हवा. श्रमिक उद्योग व देश यांचे हीत एकाच दिशेने जाणारे असते.


* अधिकार व कर्तव्य या दोन्ही भूमिकांवर संघटनेचा समान आग्रह असायला हवा. व्यक्तींचे पुढारपण व राजकीय स्वार्थ, यांना दूर ठेवून मालक -सरकार- विदेशी विचारधारा या सर्वांपासून संघटन मुक्त असायला हवे.

* आणीबाणीच्या परीक्षेच्या घडीमध्ये डाव्या व क्रांतीकारी म्हणवणाऱ्या संघटना टिकल्या नाही फक्त भा.म.संघ, या परिक्षेत खरा उतरला.

* धर्मप्रवण व्यक्ती मानस व धर्माधिष्ठित मानवी समाज हे आमच्या प्रयत्नांचे गंतव्य आहे.

* राष्ट्राच्या सर्वांगीण हितामध्येच श्रमिकांचे हित जोपर्यंत आहे. राष्ट्र उभे झाले तर श्रमिक असुरक्षित राहू शकत नाही. या उलट श्रमिक असुरक्षित झाला तर राष्ट्र उभे होवू शकत नाही. तसेच श्रमिक सुरक्षीत आहे तोपर्यंत राष्ट्र ही सुरक्षित आहे, आणि श्रमिक जर संपला तर राष्ट्र तरी कसे वाचणार?

* राष्ट्रीय व वैश्विक घडामोडी व परिदृश्य पाहुन शिवाय वास्तविकतेच्या भक्कम आधारावर उभा राहून, मी सांगू इच्छितो की, नव्या सहस्त्रकाचा सुर्योदय होईल, तेव्हा भगवान सहस्त्ररश्मि प्रसन्न होतील तेव्हा, भारतातील विविध लाल गुलाबी छटांचे झेंडे, हिंदुस्थान च्या सनातन भगव्या ध्वजामध्ये आत्मसात होवून विलीन झाले असतील. (१९८९).








प. पू. श्री. गुरूजी समवेत



स्व. अशोकजी सिंघल व
श्री. मुरली मनोहर जोशी यांच्या समवेत



जेष्ठ प्रचारक मा. मोरोपंत पिंगळे
यांच्या समवेत



श्री. एस. गुरुमुर्ती (अर्थतज्ञ)
यांच्या समवेत